प्रकरण पाच

# संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## प्रकरण पाचवे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| ५.१ | प्रास्ताविक | 87 |
| ५.२ | प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती | 88 |
| ५.३ | पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये आणि त्यांचे संक्रमण | 97 |
| ५.४ | मूल्यशिक्षण संदर्भात अध्यापकांचा कृतिसत्रातील सहभाग | 127 |
| ५.५ | मूल्य आणि अध्यापकांचे व्यक्तिमत्त्व यांचा संबंध | 137 |
| ५.६ | मूल्य आणि सामाजिक वास्तव यांचा संबंध | 145 |
| ५.७ | मूल्य आणि अभ्यासपूरक अभ्यासेत्तर कार्यक्रमाचे आयोजन | 153 |
| ५.८ | पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे संख्या प्रमाण आणि त्यामुळे मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी | 160 |
| ५.९ | मूल्ये आणि त्यांचे मूल्यमापन | 168 |
| ५.१० | प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी अन्य माहिती | 180 |
| ५.११ | समारोप | 183 |

# प्रकरण ५ वे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

### ५.१ प्रास्ताविक :

प्रकरण दोन व चार मधून प्रस्तुत संशोधनाला अनुकूल ठरेल अशी अनुक्रमे १ : मूल्य अर्थ व व्याप्ती, मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान, मूल्य संक्रमणाचा अर्थ, मूल्य संक्रमणात शिक्षक आणि शिक्षण यांची भूमिका आणि २ : ९ वी, १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण याबाबतीत चर्चा करून प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी सैद्धांतिक पार्श्वभूमी तयार केली आहे.

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून आणि अर्थनिर्वचन करून त्याचा अन्वयार्थ लावणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

यासाठी अभ्यासकाने कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील माध्यमिक शाळांमधून इयत्ता ९ वी व १० वी मराठी शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी एक प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली मुख्यतः ९ वी व १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संदर्भात आहे. (परिशिष्ट ` ब ` पहा) अभ्यासकाने अध्यापकांना व्यक्तिशः भेटून स्वतः ७५ शाळेतील १०५ अध्यापकांना प्रश्नावल्या दिल्या होत्या. त्यापैकी ९५ अध्यापकांनी (९० टक्के) त्या भरून दिलेल्या आहेत. संबंधित अध्यापकांची माहिती परिशिष्ट ` ब ` मध्ये नोंदविली आहे.

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या संशोधन साहित्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून त्या संदर्भात अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी संबंधित अध्यापकांशी झालेल्या अनौपचारिक चर्चा, मुलाखती यांचाही लाभ झालेला आहे.

### ५.२ प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती :

९, १० वीत मराठी अध्यापन करणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती प्रस्तुत संशोधनासाठी अत्यावश्यक होती. ती मिळविण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १ ते ६ प्रश्नांची योजना केली होती. प्रश्न क्र. १ व ३ या संबंधातील माहिती परिशिष्ट ' ब ' मध्ये नोंदविली आहे.

#### ५.२.१ शैक्षणिक अर्हता :

९ वी, १० वीत मराठी अध्यापन करणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक अर्हता योग्य आहे का ते पाहण्यासाठी प्रश्न क्र. ३ ची योजना केली होती. अध्यापकांनी नोंदविलेली शैक्षणिक अर्हता, पुढील सारणी क्र.५.१ मध्ये नमूद केली आहे.

**सारणी क्र. ५.१**

**अध्यापकांची शैक्षणिक अर्हतेनुसार वर्गवारी**

| अनु.क्र. | शैक्षणिक अर्हता | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | बी.ए., बी.एड्. | ३१ | ३३ |
| २. | बी.ए., एम.एड्. | १ | १ |
| ३. | एम.ए., व बी.एड्. | ३९ | ४१ |
| ४. | एम.ए., एम.एड्. | १० | २२ |
| ५. | बी.ए., बी.पी.एड्. | १ | १ |
| ६. | बी.ए., डी.पी.एड्. | १ | १ |
| ७. | बी.ए., डी.एड्. | १ | १ |

सारणी क्र. ५.१ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ८. | बी.ए., ए.एम. | १ | १ |
| ९. | बी.ए., एस.टी.सी. | २ | २ |
| १०. | एम.ए., बी.एड्. | १ | १ |
| ११. | एम.ए., एस.टी.सी. | २ | २ |
| १२. | एम.ए., पीएच.डी. | १ | १ |
| १३. | एस.टी.सी., बी.पी.एड्. | १ | १ |
| १४. | एम.ए.एस. | १ | १ |
| | एकूण : | ९५ | १०० |

माध्यमिक शिक्षणासाठी मराठी शिक्षकांची शैक्षणिक अर्हता ही किमान बी.ए., बी.एड्. मान्य करण्यात आलेली आहे. वरील सारणीमध्ये ९५ अध्यापकांपैकी ३१ अध्यापकांनी (३३ टक्के) ही शैक्षणिक अर्हता मिळविली असल्याचे पहावयास मिळते.

अत्यावश्यक शैक्षणिक अर्हता मिळवूनही त्यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता मिळविलेल्या अध्यापकांची संख्या वरील सारणीतील अनुक्रमांक २, ३, ४ यांच्या बेरजेनुसार ५२ आहे. (५५ टक्के)

याचाच अर्थ माध्यमिक शाळेत अध्यापन करण्यास योग्य असे सारणीतील अनुक्रमांक १, २, ३, ४, पदवी प्राप्त एकूण शिक्षक ८३ आहेत (८७ टक्के). यावरून असा अन्वयार्थ काढता येतो की, अध्यापकांनी अत्यावश्यक शैक्षणिक अर्हता बऱ्याच मोठ्या प्रमाणात प्राप्त केली आहे.

सारणी क्र. ५. १ मधील क्रमांक ५ ते १२ नुसार प्रथम पदवी ६ लोकांनी व पदव्युत्तर पदवी चार लोकांनी प्राप्त केली आहे. पण बी.एड्. प्रशिक्षण कोणीही पूर्ण केला नाही. माध्यमिक शाळेत अत्यावश्यक असणारे प्रशिक्षण संपादित आठ अध्यापकांकडे नसल्याने त्यांच्याकडे अध्यापन देणे चुकीचे आहे.

सारणीतील अनुक्रमांक १३ व १४ मधील पदव्या या प्रथम पदवीपूर्व आहेत. या पदव्याप्राप्त दोन अध्यापकांनी प्रथम पदवीही प्राप्त केलेली नाही. अशा अध्यापकांकडे मराठी अध्यापन माध्यमिक शाळेत मुळीच असता कामा नये.

माध्यमिक शाळेत मराठी अध्यापन करणाऱ्या अध्यापकांपैकी शैक्षणिक अर्हता अपूर्ण असलेले अध्यापक सारणीतील अनुक्रमांक ५ ते १४ मध्ये नमूद झालेल्या बेरजेनुसार १२ आहेत (१२ टक्के) अर्थात हे प्रमाण अल्प आहे हे नमूद केले पाहिजे.

वरील सारणी क्रमांक ५.१ नुसार अध्यापकांचे पदवीनुसार वर्गवारी करण्यात आलेली आहे. परंतु पदवीला त्यांनी कोणता विषय घेतला हे त्यावरून कळत नाही. मराठी विषय घेऊन योग्य शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या अध्यापकांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनासाठी गरजेचा आहे. म्हणून खालील सारणी क्र. ५.२ मध्ये पदवी परीक्षेला अध्यापकांनी घेतलेल्या विषयावरून अध्यापकांचे वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्र.५.२

**पदवी परीक्षेच्या घेतलेल्या विषयानुसार अध्यापकांचे वर्गीकरण**

| विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | इतिहास | भूगोल | मानस-शास्त्र | अर्थ शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यापक संख्या | ४४ | १२ | ६ | २ | ६ | ६ | ३ | १४ |
| टक्केवारी | ४७ | १२ | ६ | २ | ६ | ६ | ३ | १४ |

वरील सारणीच्या अवलोकनावरून असे आढळून येते की ९३ पैकी कुण ९३ अध्यापकांनी बी.ए. ही प्रथम पदवी प्राप्त केलेली आहे.परंतु केवळ ४४ अध्यापकांनी (४७ टक्के ) बी.ए. ला मराठी हा विषय घेतला आहे. मराठी हा विषय बी.ए. ला न घेता अन्य विषय घेऊन बी.ए. झालेले ४९ अध्यापक (५२ टक्के) आहेत. यावरून असा अन्वयार्थ काढला येतो की, बी.ए. ला ' मराठी ' घेऊन पदवी मिळविणारे व अध्यापन करणारे अध्यापक ५० टक्के हून कमी आहेत. इतर अध्यापकांना (५२ टक्के) ' मराठी ' हा विषय अध्यापनास देणे हे चुकीचे आहे.

सारणी क्र. ५. २ प्रमाणेच अध्यापकांनी पदव्युत्तर परीक्षेला घेतलेल्या विषयावरून अध्यापकांचे वर्गीकरण केले आहे. सारणी क्र. ५.३ मध्ये केलेले आहे.

## सारणी क्र. ५.३

### पदव्युत्तर परीक्षेत घेतलेल्या विषयानुसार अध्यापकांचे वर्गीकरण

| विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | इतिहास | भूगोल | समाजशास्त्र | अर्थशास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यापक संख्या | ३९ | ७ | १ | – | २ | – | ३ | ३ |
| टक्केवारी | ७१ | ७ | १ | – | २ | – | ४ | ३ |

वरील सारणीनुसार असे दिसून येते की, एकूण ५५ अध्यापकांपैकी ५५ अध्यापक एम.ए. ही पदवी प्राप्त आहेत. ३९ अध्यापकांनी (७० टक्के) 'मराठी' हा विषय घेऊन एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. हे प्रमाणही ५० टक्के हून कमी आहे व १६ अध्यापकांनी (२७ टक्के) अन्य विषय घेऊन एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. हे प्रमाण ३० टक्के अल्प असले तरी अशा अध्यापकांनाही प्रथम पदवीला 'मराठी' हा विषय आहे किंवा नाही हे पाहूनच 'मराठी' हा विषय अध्यापनास देण्यात यावा. अन्यथा तो देण्यात येऊ नये.

सारणी क्र. ५.१, ५.२, ५.३ वरून असे अनुमान काढता येते की सारणी क्र. ५.१ मध्ये शैक्षणिक अर्हता प्राप्त असणाऱ्या अध्यापकांचे प्रमाण बरेच मोठे (८७ टक्के) वाटते तरी सारणी क्र. ५.२ व सारणी क्र. ५.३ नुसार मराठी विषयाचा विचार केल्यास ते प्रमाण ५० टक्क्यांहूनही कमी आहे. (अनुक्रमे ४६ टक्के व ४० टक्के) हे ध्यानात घेतले पाहिजे. म्हणून विषयानुरूप योग्य शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकांची नेमणूक माध्यमिक शाळांमधून अधिकाधिक करणे गरजेचे आणि अत्यावश्यक वाटते.

सारणी क्र. ५.४

बी.एड्.ला मराठी अध्यापन पध्दती
घेतलेले शिक्षक

| अध्यापन पध्दती | अध्यापक संख्या | शेकडा टक्केवारी |
|---|---|---|
| मराठी | ६८ | ७२ |

वरील सारणीवरुन असे आढळून येते की ६८ अध्यापकांची (७२ टक्के) बी.एड्. कोर्ससाठी मराठी अध्यापन पध्दती घेतलेली आहे.

याचाच अर्थ २७ अध्यापकांनी (२८ टक्के) बी.एड्. ला मराठी अध्यापन पध्दती घेतलेली नाही. पदवी परीक्षेला मराठी विषय नसलेल्या आणि बी.एड्.ला मराठी अध्यापन पध्दती न घेतलेल्या अध्यापकांकडे मराठी अध्यापन सुयोग्य देऊ नये. तसेच केवळ बी.एड्. ला मराठी अध्यापन पध्दती घेतली म्हणूनही अध्यापकाकडे मराठी अध्यापन देऊ नये. कारण वाङ्मयाचा अभ्यास पदवी परीक्षेलाच होतो आणि मराठी वाङ्मय, भाषा यांचे योग्य ज्ञान अध्यापकाला त्यामुळे येत असते.

५.२.२ अध्यापकांचा अनुभव :

प्रस्तुत संशोधनात आवश्यक पूरक माहिती मिळविण्याच्या हेतूने प्रश्न क्र. ४, ५, ६ ची योजना प्रश्नावली मध्ये केलेली होती. संकलित माहितीचे वर्गीकरण खाली केले आहे.

प्रश्न क्र.४ द्वारे अध्यापकाचा एकूण अनुभव विचारलेला होता. तो खालील सारणीमध्ये नोंदवलेला आहे.

**सारणी क्र. ५.५**

**अध्यापकांचा एकूण अनुभवाची वारंवारता**

| वर्षे वर्गांतर | अध्यापकांची संख्या |
|---|---|
| ३१ ते ३३ | ५ |
| २८ ते ३० | १० |
| २५ ते २७ | ९ |
| २२ ते २४ | ६ |
| १९ ते २१ | १६ |
| १६ ते १८ | ९ |
| १३ ते १५ | १५ |
| १० ते १२ | १२ |
| ७ ते ९ | ४ |
| ४ ते ६ | ४ |
| १ ते ३ | ५ |

वरील सारणीवरून असे आढळून येते की अध्यापकांच्या एकूण अनुभवाचे मध्यमान १७.८८ येते (परिशिष्ट 'क' पाहा). म्हणजेच जवळजवळ १८ वर्षे इतके येते. कोणताही मापदंड लावला तरी इतक्या वर्षांचा (१८ वर्षे) हा अनुभव दीर्घ अनुभव म्हणावयास हरकत नाही. यावरून असे प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा अनुभव हा प्रदीर्घ असून त्यामुळे त्यांनी दिलेला प्रतिसाद हा अनुभवसिद्ध आहे असे मानावयास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नसावा.

प्रश्न ५ मध्ये अध्यापकांचा मराठी शिकविण्याचा अनुभव विचारण्यात आलेला होता. त्याला मिळालेला प्रतिसाद खालील सारणी क्र. ५.६ मध्ये नोंदविलेला आहे.

<u>सारणी क्र. ५.६</u>

अध्यापकांच्या 'मराठी' अध्यापनाच्या अनुभवाची वारंवारी

| वर्ष वर्गांतर | अध्यापक संख्या |
|---|---|
| ३१–३३ | २ |
| २८–३० | ७ |
| २५–२७ | ७ |
| २२–२४ | २ |
| १९–२१ | १५ |
| १६–१८ | ७ |
| १३–१५ | १६ |
| १०–१२ | १६ |
| ७–९ | ५ |
| ४–६ | ५ |
| १–३ | १२ |

वरील सारणीवरून असे आढळून येते की, अध्यापकांचे 'मराठी' अध्यापन करण्याच्या अनुभवाचे मध्यमान १५.८० (पाहा परिशिष्ट 'ड') म्हणजे जवळजवळ १६ वर्षे आहे. हा अनुभव प्रदीर्घ मानावयास कोणाचाही प्रत्यवाय नसावा.

अशाप्रकारे प्रश्न क्र. ६ मध्ये ९ वी, १० वीला मराठी अध्यापनाचा अनुभव विचारला होता. त्याला मिळेला प्रतिसाद खालील सारणीमध्ये नोंदविलेला आहे.

<u>सारणी क्र.१.७</u>

अध्यापकांच्या ९ वी, १० वीला ` मराठी
<u>अध्यापन करण्याच्या अनुभवाची सरासरी</u>

| वर्षे (वर्गांतर) | अध्यापक संख्या |
|---|---|
| ३१–३३ | – |
| २८–३० | ५ |
| २५–२७ | ७ |
| २२–२४ | – |
| १९–२१ | १४ |
| १६–१८ | ५ |
| १३–१५ | १४ |
| १०–१२ | १२ |
| ७–९ | ९ |
| ४–६ | १० |
| १–३ | १८ |

वरील सारणीवरून असे आढळून येते की, ९ वी, १० वीला ` मराठी ` अध्यापन करण्याच्या अध्यापकांच्या अनुभवाचे मध्यमान हे १२.५० वर्षे (पहा परिशिष्ट ` ह `) आहे. म्हणजे जवळजवळ ते १३ वर्षे आहे. याचा अर्थ असा निघतो की, अध्यापकांचा ९ वी, १० वीला मराठी अध्यापन

करण्याचा अनुक्रम हा येथील प्रदीर्घ आहे. त्यामुळे त्यांनी प्रश्नावलीला दिलेला प्रतिसादही अनुक्रमविरुद्ध मानाण्यास काहीही हरकत नसावी.

## ५.२ पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये व त्यांचे संक्रमण :

पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीव-पूर्वक संक्रमित केली जातात की नाही, ती संक्रमित केली जात नसल्यास कोणती कारणे संभवतात, मूल्यांचे संक्रमणाचे प्रमाण काय आहे, आणि मूल्ये संक्रमित होत नसतील तर त्याची कारणे कोणती? या संबंधीत माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ७, ७अ, ७ब, ७क, ८ आणि ९ यांची योजना केलेली होती. अध्यापकांनी या संबंधीत दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण आणि विश्लेषण खाली केले आहे.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ७ - " नव्वी, दहावीच्या पाठ्यपुस्तकाचे अध्यापन करीत असताना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? " हा होता. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. प्रश्नाला दिलेल्या होय-नाही या दोन पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केला आहे.

सारणी क्र. ५.८

पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्याबाबत अध्यापकांचे मत

| अनु. | होय-नाही | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ७० | ७३ |
| २. | नाही | २५ | २७ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी क्र. ५.८ मध्ये नोंद झालेल्या अध्यापकांच्या प्रतिसादावरून असे अनुमान काढता येते की, ९ वी, १० वीच्या मराठी पाठ्यपुस्तकांचे अध्यापन करीत असताना पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात असे ९५ अध्यापकांपैकी ७० अध्यापकांचे (७३ टक्के) म्हणणे आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाही असे ९५ पैकी २५ अध्यापकांचे (२७ टक्के) म्हणणे आहे

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, ७३ टक्के अध्यापकांच्या मते माध्यमिक शाळांतून मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ७ अ " पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात असल्यास ती कशा प्रकारे संक्रमित केली जातात ? " हा होता. अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादांमधून जाणवले त्यानुसार ज्ञान वाढायाचे प्रतिसाद विशिष्ट विभागांत समाविष्ट करून

मूल्ये क्रमित करण्याचे मार्ग आणि त्यांची वारंवारिता पुढील सारणी क्र. ५.१ मध्ये नोंदविलेली आहे.

<u>सारणी क्र. ५.१</u>

<u>अध्यापकांनी सुचविलेले मूल्ये क्रमित करण्याचे मार्ग</u>
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनु. | मूल्ये क्रमित करण्याचे मार्ग | अध्यापक प्रतिसाद | |
|---|---|---|---|
| १. | व्यवहारातील, साहित्यातील व पौराणिक ऐतिहासिक उदाहरणे व दाखल्यांद्वारे | ३० | ४३ |
| २. | अध्यापकाचे प्रभावी अध्यापन | २५ | ३६ |
| ३. | अध्यापकाचा व्यासंग, वर्तन, दृष्टिकोन | ७ | १० |
| ४. | पाठ्यांशातील आशय स्पष्टीकरण | ६ | ९ |
| ५. | चर्चा | ४ | ६ |
| ६. | मूल्यांवर आधारित गृहपाठ देऊन | ३ | ४ |
| ७. | मूल्याधिष्ठित प्रश्नांच्या आधारे | २ | ३ |
| ८. | मूल्यांचे जीवनातील महत्त्व व गरज कथन | १ | १ |
| ९. | वाक्प्रचारांच्या आधारे | १ | १ |
| १०. | सामाजिक परिस्थितीच्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करून | १ | १ |
| ११. | पाठांतराच्या आधारे | १ | १ |

वरील सारणीतील अनुक्रमांक १ - व्यवहारातील, साहित्यातील, ऐतिहासिक व पौराणिक उदाहरणे व दाखल्यांद्वारे मूल्ये क्रमित करता येतात असे ७० अध्यापकांपैकी ३० अध्यापकांचे (४३ टक्के) म्हणणे आहे.

याचाच अर्थ अनुमीक १ - हा मार्ग मूल्यें संक्रमित करण्यास बऱ्याच मोठ्या प्रमाणात वापरला जातो.

हे अध्यापकांचे म्हणणे पटण्यासारखे आहे. व्यवहारातील, साहित्यातील, तसेच ऐतिहासिक, पौराणिक दाखले ज्यावेळी अध्यापक विद्यार्थ्यांना देत असतो त्यावेळी त्या उदाहरणांतून त्या दाखल्यांतून सद्गुण, मूल्यांना आदर्श मानून जीवन व्यतीत केलेल्या व्यक्तिमत्वाची ओळख तो त्यांना करून देत असतो. समाज जीवनामध्ये मूल्यांचा पाडाव ऱ्हास होण्याच्यावेळी असतानाही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील अशी व्यक्तिमत्वे दाखल्यांद्वारे, उदाहरणाद्वारे विद्यार्थी समजावून घेऊ शकतो. तसेच एका व्यक्तीचे वर्तन हे दुसऱ्या व्यक्तीला आदर्शभूत वाटल्यास ते अनुकरणीय वाटू लागते. विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात मूल्ये आपोआप संक्रमित होऊ शकतात. तसेच 'मूल्य' ही अमूर्त कल्पना असल्याने मूल्यांचे दृश्य रूप साधा व्यक्तिमत्त्वामध्ये त्याच्या जीवन व्यवहारामध्ये न्याहाळता येते. साहित्य, व्यवहार, पुराण आणि इतिहास यामधील उदाहरणे आणि दाखले मूल्यांचे मूर्तस्वरूपामध्ये (दृश्य रूप) दर्शन विद्यार्थ्यांना घडवित असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमित होण्यास सुलभ होते.

अनुमीक २ - अध्यापकांचे प्रभावी अध्यापन हा मूल्य संक्रमित करणाऱ्या मार्गाला ७० अध्यापकांपैकी २५ अध्यापकांनी (३६ टक्के) प्रतिसाद दिला आहे. याचा अर्थ मूल्यें संक्रमित करण्याचा हा मार्ग बऱ्याच प्रमाणात वापरला जातो.

मूल्य संक्रमण म्हणजे संस्कार करणे होय. आणि संस्कार करण्याचे एक प्रभावी साधन म्हणजे प्रभावी अध्यापन होय. मूल्य संक्रमण म्हणजे 'या हृदयीचे त्या हृदयी घालणे' अशा प्रकारे असते. वेगवेगळ्या वातावरणातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये मूल्ये संक्रमित करण्यासाठी,

मूल्यांना अनुकूल वातावरण निर्माण करणे, त्या मूल्यांच्या संक्रमणास योग्य अशी विद्यार्थ्यांची मनोभूमिका तयार करणे आणि अत्यंत प्रभावीपणे ' मूल्य ' विद्यार्थ्यांसमोर उदाहरणे ठेवणे हे अध्यापकाच्या प्रभावी अध्यापनातून शक्य होईल. अयोग्य अशा वातावरणातून येणाऱ्या मुलांना वातावरणाचा क्षणभर विसर पाडून अत्यंत मनस्वीपणे अध्यापन करणारा शिक्षक विद्यार्थ्यांवर संस्कार करू शकतो. अशी परिस्थिती पूरक नसतानाही अध्यापकाचे अध्यापन विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास उत्सुकतेने भाग पाडते. म्हणूनच मूल्य संक्रमण करण्यासाठी हाही मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे असे म्हटले पाहिजे.

अनुक्रमांक ३ - ' अध्यापकाचा व्यासंग ' वर्तन, दृष्टिकोन ' या मूल्य संक्रमण करण्याच्या मार्गाला ७० अध्यापकांपैकी ७ अध्यापकांनी (१० टक्के) प्रतिसाद दिलेला आहे.

आकडेवारीचा विचार केला असता हा मार्ग कमी अध्यापकांना महत्त्वाचा वाटत असला, तरी तो सर्व शिक्षकांनी चोखाळण्यास हरकत नसावी. कारण मूल्य संक्रमणासंबंधात असे म्हटले जाते की, **Values are caught not taught** आणि हे जर खरे तर मूल्यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून अध्यापकाने राहणे गरजेचे आहे. त्यासाठी अध्यापकाचा व्यासंग, वर्तन, दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो कारण याचा अनुकरण आणि प्रत्यक्षही प्रभाव विद्यार्थ्यांच्या मनावर पडत असतो.

अनुक्रमांक ४ - पाठ्यांशातील आशय स्पष्टीकरण, ५) चर्चा ६) मूल्यांवर आधारीत प्रश्न, ७) मूल्याधिष्ठित प्रश्नांच्या आधारे यांना ७० अध्यापकांपैकी ६ (९ टक्के), ४ (६ टक्के), ३ (४ टक्के), २ (३ टक्के) अध्यापकांनी प्रतिसाद दिलेला आहे.

तसेच अनुक्रमांक ८ - मूल्यांचे जीवनातील महत्त्व व गरज सांगून, ९ - वाक्प्रचारांच्या आधारे, १० - सामाजिक परिस्थितीच्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करून, ११ - पाठांतराच्या आधारे यांना ७० अध्यापकांपैकी प्रत्येकी १ (१ टक्का) अध्यापकाने प्रतिसाद दिलेला आहे.

अनुक्रमांक ४ ते ११ यांना अध्यापकांनी अल्पसा दुर्बळाने प्रतिसाद दिला असला तरी, मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात हेही मार्ग महत्त्वाचे आहेत व त्यांचा वापर अध्यापकांनी जाणीवपूर्वक करावा असे सुचवावेसे वाटते.

प्रश्न क्र. ७ ब - " पाठ्यपुस्तकाचे अध्यापन करीत असताना पाठा-मधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नसल्यास पुढे दिलेल्या ज्या कारणांपैकी कोणती कारणे संभवतात ? " हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. प्रत्येक कारणापुढे मान्य असल्यास (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी कारणांना दिलेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

<u>सारणी क्र. ५.१०</u>

**मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित न करण्यामागील कारणे**
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनु. | कारणे | अध्यापकांचा प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षा पद्धतीत मूल्यांवर प्रश्न नसतात. | २० | २१ |
| २. | शिक्षण हा व्यवसाय न मानता नोकरी मानल्याने अध्यापकांचा मूल्य शिक्षणात रस नाही. | १३ | १८ |
| ३. | मूल्य शिक्षणावर भर दिल्यास अभ्यास-क्रम पूर्ण होणार नाही असा अध्यापकांचा समज. | १२ | १७ |

सारणी क्र.५.१० (पुढे चालू...)

| क्र. | कारणे | अध्यापकांचा प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ४. | शिक्षण अधि औरिएंटेड झाल्याने मूल्यात्मक शिक्षणाकडे दुर्लक्ष. | १४ | १४ |
| ५. | जीवन व्यवहार अध्यापकांना महत्त्वाचा वाटू लागला आहे. | ११ | ११ |
| ६. | मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकांचे अज्ञान अधिक आहे. | ९ | ९ |

एकूण ९५ अध्यापकांनी प्रश्नावली भरून दिलेली आहे. त्यापैकी २५ अध्यापकांनी प्रश्न क्रमांक ७ (ब) ला प्रतिसाद दिलेला आहे. प्रतिसादाचे हे प्रमाण टक्के २६ आहे.

सारणी क्र. ५.१० मधील अनुक्रमांक १ - परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाहीत. या कारणाला २५ अध्यापकांपैकी २० अध्यापकांनी (८० टक्के) प्रतिसाद दिलेला आहे. प्रश्नावली भरून देणाऱ्या एकूण अध्यापकांचा (९५ टक्के) विचार केल्यास हे प्रमाण (२२ टक्के)आहे.

परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाहीत त्यामुळे जाणीवपूर्वक मूल्ये रूजवित होऊन शकत नाही असे अध्यापकांना (२२ टक्के) वाटते. परंतु ' मूल्य ' या संकल्पनेचे स्वरूप आणि आजच्या परीक्षा पध्दतीचे स्वरूप याचा विचार केला असता आजच्या परीक्षा पध्दतीत, मूल्यांवर आधारीत प्रश्न आपणास विचारता येतील का ? आणि विचारल्यास मूल्यरूजवणाच्या संदर्भात आपल्याला यथार्थ मूल्यमापन करता येईल का या संदर्भात शंका अधिक रास्त आहेत. १) तोंडी परीक्षा, २) प्रात्यक्षिक परीक्षा, ३)निरीक्षण

४) प्रश्नावली, ५) प्रासंगिक नोंदी, ६) पडताळा सूची ७) पदनिश्चयन श्रेणी, ८) सामाजिक मूल्यांकन यांचा वापर परीक्षा पध्दतीमध्ये जोपर्यन्त आपण करू शकत नाही तोपर्यन्त परीक्षा पध्दती मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करावयास अपुरी आहे हे मान्य करावे लागते.

दुसरे असे की, परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नसतील त्यामुळे जाणीवपूर्वक मूल्ये संक्रमित होऊ शकत नाही असे म्हणणाऱ्या अध्यापकांचा दृष्टिकोन हा 'संकुचित' वाटतो. कारण 'व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास' हे संपूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट लक्षात घेता काही अध्यापकांचे हे म्हणणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य वाटत नाही.

अनुक्रमांक. 2.

शिक्षण हा व्यवसाय न मानता नोकरी मानल्याने अध्यापकांचा मूल्य शिक्षणात रस नाही. या कारणास २५ अध्यापकांपैकी १७ (६४ टक्के) अध्यापकांनी प्रतिसाद दिला आहे. प्रश्नावली भरून दिलेल्या १५ अध्यापकांचा विचार करता हे प्रमाण ६८ टक्के आहे.

शिक्षण हा 'व्यवसाय' न मानता 'नोकरी' मानणे हा दृष्टिकोनच चुकीचा आहे. कारण शिक्षण हा धर्म मानून निष्ठापूर्वक अध्ययन-अध्यापन आणि मूल्यसंक्रमण संपन्न करीत राहणे हे अध्यापकाचे कर्तव्य ठरते. आपली संस्कृती रक्षणाचे, भावी पिढी घडविण्याचे, राष्ट्र विकासाचे आणि समाजमनाच्या मशागतीचे कार्य हाती घेतले आहे याची जाणीव असणा-यांनीच शिक्षकी पेशा पत्करावा असे उचित वाटते.

अनुक्रमांक ३ – 'मूल्य शिक्षणावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही' असा अध्यापकांचा समज' हा होता. आज २५ अध्यापकां-पैकी १६ अध्यापकांनी (६४ टक्के) प्रतिसाद दिला आहे. प्रश्नावली भरून

घेणाऱ्या ९५ अध्यापकांचा विचार करता हे प्रमाण ९७ टक्के पडते. अभ्यासक्रमाची पूर्तता केली की कार्यभाग संपला अशी अध्यापकांची भूमिका बनत असल्याचे चित्र सद्य: परिस्थितीमध्ये पहावयास मिळते. परंतु ' मूल्यशिक्षणाकडे लक्ष दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही असा अध्यापकांचा समज आहे ' या म्हणण्यामध्ये काही तथ्य नाही. मूल्यशिक्षणाकडे लक्ष द्यायचे म्हणजे स्वतंत्र तास घ्यायचा किंवा जादा वेळ द्यायचा असा अध्यापकांचा समज असेल तर तो चुकीचा आहे. मूल्यसंक्रमण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने अध्यापन करणारा अध्यापकही मूल्यसंक्रांती, आपला दृष्टिकोन, वर्तन आणि भाषिक यांच्या आधारे मूल्यसंक्रमण उत्तेजित करू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे.

दुसरे असे की, अभ्यासक्रम पूर्ण करणे हे शैक्षणिक उद्दिष्ट मानणे ही भूमिकाच चुकीची आहे. कारण वर्तन परिवर्तन करणे हे उद्दिष्ट आपण महत्त्वाचे मानतो.

सारणीतील अनुक्रमांक ४ - ' शिक्षण मार्क ओरिएंटेड झाल्याने मूल्यात्मक शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. ९५ अध्यापकांपैकी ५४ अध्यापकांनी (५६ टक्के) या कारणाला प्रतिसाद नोंदविला आहे. प्रश्नावली भरून देणाऱ्या ९५ अध्यापकांचा विचार करता हा प्रतिसाद १४ टक्के आहे.

मानवी प्रगतीचा विचार करीत असताना आरंभापासून मानवाने नेहमी गतीचा कायदा पाळलेला पहावयास मिळतो -

' कायदा पाळा गतीचा
काळ मागे लागला,
थांबला, तो संपला. '

असे म्हटले जाते ते योग्य आहे. मानवी प्रगतीच्या उत्कर्षामध्ये मानवाने गतीलाच आत्मसात केले आहे. शिक्षण मार्क ओरिएंटेड होणे हे त्या

प्रक्रियेतील एक भाग आहे. म्हणून शिक्षण जॉब ओरिएंटेड झाल्याने मूल्यात्मक शिक्षणाकडे दुर्लक्ष होते असे म्हणणे म्हणजे मानवी जीवन व्यवहारात अनिवार्य ठरत गेलेल्या गोष्टी मूल्य शिक्षणासाठी अव्हेरणे होय. शिक्षण जॉब ओरिएंटेड होणे ही आजच्या युगाची अत्यावश्यक गरज आहे. विशेष म्हणजे कोणत्याही कालखंडाचा विचार केला तरी शिक्षण हे जॉब ओरिएंटेड राहिलेले आहे हे मान्य केले पाहिजे. म्हणून मानवी प्रगतीला जमीनी खाली खाली गाडणारते ' भाग्यभूषण ' टिकवून ठेवण्यासाठी आपणास जॉब ओरिएंटेड शिक्षण आणि मूल्यात्मक शिक्षण यांचा बरोबरीने विचार केला पाहिजे. त्याला अनेक दुवे प्राप्त करून घेणे हे आजच्या युगात शक्य असते तरी इष्ट नाही.

सारणीतील अनुक्रमांक ५ - ' जीवन व्यवहार अध्यापकांना महत्त्वाचा वाटू लागला आहे ' हा होता. २५ अध्यापकांपैकी ११ अध्यापकांनी (४४ टक्के) हा प्रतिसाद नोंदविला आहे. प्रश्नावली भरून देणाऱ्या ९५ अध्यापकांचा विचार करता हे प्रमाण ११ टक्के पडते.

जीवन व्यवहार महत्त्वाचा वाटणे हे स्वाभाविक आहे. पण जीवन-व्यवहाराचा मूल्य हा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा घटक आहे हे विसरून चालणार नाही. जीवन व्यवहारा बद्दलच्या कल्पना बदलण्या पाठीमागे, झालेली भौतिक प्रगती आणि मानवी जीवन संघर्ष कारणीभूत असला तरी, अध्यापकांनी जीवन व्यवहाराकडे लक्ष देत असतानाच मूल्यसंवर्धनाचे मूल्य जाणून घेतले पाहिजे. जीवन व्यवहार हा आदर्शाशी असावा याचे भान अध्यापकांनी ठेवले पाहिजे. विशिष्ट मूल्ये धारण करून जीवन जगत असलेला अध्यापक जीवन व्यवहार देखील आदर्श राखत असतो हे विसरून चालणार नाही. त्यामुळे जीवन व्यवहार अध्यापकांना महत्त्वाचा वाटू लागल्याने जाणीवपूर्वक मूल्ये संक्रमित करण्यामध्ये अडचणी येतात हे म्हणणे पटणारे नाही.

सारणीतील अनुक्रमांक ६ –" मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकांचे ज्ञान अधिक आहे " हा होता. २५ अध्यापकांपैकी ९ अध्यापकांना (३६ टक्के) त्याला प्रतिसाद दिला आहे. प्रश्नावली भरून देणाऱ्या ९५ अध्यापकांचा विचार करता हे प्रमाण ९ टक्के पडते. या कारणाला अल्प प्रमाणात प्रतिसाद मिळाला असला, तरी हे कारण वस्तुस्थितीला धरून असल्याचे जाणवते. मूल्य म्हणजे काय ? मूल्यांचे संक्रमण म्हणजे काय ? मूल्य संक्रमणाचे मार्ग कोणते ? त्यांचे उपयोजन कशाप्रकारे करायचे या संदर्भात अपुरे ज्ञान अध्यापकांमध्ये असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १० मध्ये मूल्यशिक्षणाच्या संदर्भात शासन कृतिसत्र किंवा प्रशिक्षण शिबीरास आपण उपस्थित राहिला आहात काय ? असा प्रश्न विचारला होता. केवळ १६ अध्यापकांनी होकारार्थी प्रतिसाद दिला आहे (सारणी क्र. ५.१४ पहा) व ७८ अध्यापकांनी नकारार्थी प्रतिसाद दिला आहे. यावरूनही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकांचे ज्ञान अधिक आहे हे सिद्ध करता येते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ क – " ९ वी, १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे अध्यापन करीत असताना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? उत्तर नाही असल्यास कोणती अन्य कारणे संभवतात ? " हा होता. हा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. अन्य कारणे जाणून घेण्याच्या उद्देशाने या मुक्त प्रश्नाची योजना केली होती. अध्यापकांनी दिलेल्या कारणांतून साधर्म्य तत्त्वानुसार वर्गीकरण करून खालील सारणी क्र. ५.११ मध्ये २० विधाने प्राध्यापकांच्या प्रतिसादासह नोंदविलेली आहेत.

सारणी क्र. ५.११

मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत याची अन्य कारणे

| अनु. | अन्य कारणे | अध्यापकांचा प्रतिसाद |
|---|---|---|
| १) | सर्व स्तरावर मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो. त्यामुळे मूल्यांवरील विश्वास उडतो. | ३ |
| २) | मूल्य शिक्षणाच्या संदर्भात प्रशिक्षण नाही. | २ |
| ३) | वर्गातील विद्यार्थ्यांची अधिक संख्या | २ |
| ४) | विद्यार्थ्यांना बाह्य आकर्षणे जास्त आकर्षित करतात (सिनेमा, टी.व्ही., रेडिओ, व्ही.सी.आर. चे कार्यक्रम) | २ |
| ५) | शिक्षकांचे संदर्भीय वाचन कमी | २ |
| ६) | शिक्षकाचे जीवन वैफल्यग्रस्त व समस्याप्रधान असते. | १ |
| ७) | सुधारणेचा मक्ता आम्हीच का घ्यावा असे अध्यापकांना वाटते. | १ |
| ८) | शालेय प्रशासन व पालकांकडून प्रोत्साहन नाही. | १ |
| ९) | शिक्षकांना क्षमतेपेक्षा अधिक विषय शिकवावे लागतात. | १ |
| १०) | विद्यार्थी व अध्यापक परिवाराची मनोवृत्ती आहे. | १ |
| ११) | मूल्यशिक्षणा संदर्भात अध्यापकाचे व्यक्तिमत्व आड येते. | १ |
| १२) | अध्यापकांना वाढीव तासांचे काम | १ |
| १३) | सुधारणावादी अभ्यासक्रम व स्थानिक शिक्षक यांच्यातील वैचारिक संघर्ष | १ |

सारणी क्र. ५.११ (पुढे चालू...)

| अनु. | अन्य कारणे | अध्यापकांचा प्रतिसाद |
|---|---|---|
| १४) | निःस्पृह व ध्येयवादी अध्यापकांचा अभाव | १ |
| १५) | अध्यापक व विद्यार्थी यांच्यातील कृतिशून्यता | १ |
| १६) | राष्ट्रीय शिक्षण धोरणाची योग्य अंमलबजावणी नाही | १ |
| १७) | शिक्षकांच्या आवडीचा विषय अध्यापकांना मिळतोच असे नाही, त्यामुळे अध्यापनात रस कमी. | १ |
| १८) | अध्यापकांचा मुलांशी संवाद कमी | १ |
| १९) | मराठी सोपी भाषा मानून शिकण्याकडे दुर्लक्ष | १ |

मूल्ये जाणीवपूर्वक रुजविली जात नाहीत असे मत मांडणारे एकूण अध्यापक २५ आहेत (सारणी क्र. ५.८ पहा). परंतु मूल्ये जाणीवपूर्वक रुजविली जात नसल्याची अन्य कारणे मात्र १४ (५६ टक्के) अध्यापकांनी नोंदविलेली आहेत. ९१ अध्यापकांचा विचार करता हे प्रमाण १५ टक्के आहे.

सारणीतील अनुक्रमांक १ - सर्व स्तरावर मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो. त्यामुळे मूल्यांवरील विश्वास उडत चालला आहे. याला २ अध्यापकांनी (२२ टक्के) होकारार्थी प्रतिसाद नोंदवलेला आहे.

स्तरावरील मूल्यांचा ऱ्हास मूल्यांवरील विश्वास उडण्याला कारणीभूत आहे हे अध्यापकांचे म्हणणे निश्चित पटावे.

घरातील कौटुंबिक वातावरणाचा परिणाम मुलांवर इष्ट वा अनिष्ट प्रकारे होत असतो. आईवडिलांची सततचाने होणारी भांडणे मुलांच्या अंतर्मनात वैचारिक गोंधळ निर्माण करतात. व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचाराचे वर्तन करणारे आईवडील नकळत स्वैराचाराचे शिक्षण आपल्या मुलांमधून करीत असतात. कौटुंबिक आचारसंहितेचे मूल्य न पाळणारे आईवडील मुलांचे आदर्श ठरू शकत नाहीत. श्रीमंतीत वाढलेले आईवडील आणि त्यांनी बेजबाबदारपणे मुलांवर उधळलेले पैसे मुलांना बेजबाबदार करण्यास कारणीभूत ठरतात. तसेच अत्यंत दारिद्र्य रेषे-खाली राहणाऱ्या कुटुंबातील आईवडील पैशांच्या अभावामुळे मुलांवर संस्कार करण्यास असमर्थ ठरतात. पण श्रीमंत असोत वा गरीब आईवडील असोत आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून कौटुंबिक वातावरण राखू शकतात. मुलांना योग्य मार्गदर्शन करू शकतात. त्यांच्या उत्कर्षाप्रत वात्सल्याने झटू शकतात. त्यांची मुले वाममार्गाला न जाता योग्य पायावर टिकतात. म्हणून सामाजिक वातावरणाचा एक घटक म्हणून कौटुंबिक वातावरण सुयोग्य ठेवण्याचा प्रयत्न पालकांनी आवर्जून केला पाहिजे असे संशोधिकेला वाटते.

सामाजिक परिसर आणि सामाजिक वातावरण यांचे निरीक्षण केले असता मूल्यांचा ऱ्हास समाजामध्ये का होतो आहे हे पडताळून पाहता येते. कारण आजची जीवनपद्धतीच मूल्यांना मारक ठरत जात आहे. मूल्यशिक्षण आणि जीवनव्यवहार यांची फारकत या जीवनपद्धतीमध्ये झालेली पदोपदी जाणवते. कोणत्याही मार्गाने पैसा मिळवून प्रतिष्ठेने जगता येते असे रूढ झाल्याने समाजात शिक्षणाबद्दलची आस्था कमी होते की काय अशी शंका यावी इतकी परिस्थिती बिकट बनत चाललेली आहे. व्यवहारात दिसणारी उक्ती आणि कृती यांच्यामधील दिसणारी विसंगती

पैकील मूल्यांच्या ऱ्हासास कारणीभूत ठरलेली आहे. व्यक्तीने सुसंस्कृत असावे अशी अपेक्षा केली जाते, पण प्रत्यक्षात सुसंस्कृतपणाचे ढोंग समाजामध्ये उघडपणाने मिरवताना दिसत आहे.

" कमाल घोडोही दमले माझ्या
गुणवंतांना मात्र झोपड्या "

अशी वस्तुस्थिती दिसते आहे. या वस्तुस्थितीमुळे शिक्षण आणि शिक्षक यांच्या आदर्श कमी होत चालला आहे.

व्यसनाधिनता, गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि अनैतिकता या गोष्टींना समाजामध्ये प्रतिष्ठा मिळत असल्याचे समाजामध्ये दिसत आहे. त्यामुळे या गोष्टींनी युक्त असणारे जीवन प्रतिष्ठेचे असते असा समज अनुकरणशील विद्यार्थ्यांचा होत आहे. समाजातील खोट्या प्रतिष्ठांचा हा फेस समाजाच्या मनातून उतरवण्याचा प्रयत्न सातत्यपूर्वक व निर्धारयुक्त अंतःकरणाने करणे गरजेचे आहे. शिक्षण हे माणसातील योग्य बदल करण्याचे महत्त्वाचे साधन असल्यामुळे शिक्षणाद्वारेच आपल्याला समाजातील मूल्यांचा होत असलेला ऱ्हास थांबविता येईल त्यासाठी निर्धार करणे गरजेचे आहे. मूल्यांचा समाजात होणारा ऱ्हास थांबवायचा असेल तर येणारी पिढी उदार विचारांनी युक्त अशी निर्माण करणे गरजेचे आहे. पिढीला घडविण्याचे कार्य अध्यापकांना करायचे आहे. चुकीच्या गोष्टींचा प्रभाव वाढत असताना निर्धारपूर्वक सामना करणे शूरपणाचे लक्षण आहे. हा सामना मूल्यशिक्षण करू इच्छिणाऱ्या अध्यापकांनी करायचा आहे.

सारणीतील अनुक्रमांक २ - मूल्य शिक्षणाच्या संदर्भात प्रशिक्षण नाही, अनुक्रमांक ३ - विद्यार्थ्यांची वर्गातील अधिक संख्या, अनुक्रमांक ४ - विद्यार्थ्यांना बाह्य आकर्षणे जास्त आकर्षित करतात आणि अनुक्रमांक ५ -

शिक्षकाचे संदर्भीय वाचन कमी. या विधानांना प्रत्येकी २ अध्यापकांनी (२५ टक्के) प्रतिसाद दिला आहे.

कोणत्याही गोष्टीचे सुनियोजित अध्यापन करायचे असेल तर त्या साठी अध्यापकाला प्रशिक्षणाची गरज असते. प्रशिक्षणातून सुनियोजित अध्यापन क्रियाविधीचा नवीन दृष्टिकोन नवा मिळत असतो, तसेच अनेक सुनियोजित मार्गही प्रशिक्षणामध्ये उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रशिक्षणाने अध्यापकाला विशिष्ट दृष्टी लाभते. त्यामुळे सुनियोजित अध्यापन करून अध्यापकाला इच्छित उद्दिष्ट गाठता येते. मूल्यशिक्षणाच्या संदर्भातही प्रशिक्षणाची आवश्यकता याच कारणासाठी आहे.

विद्यार्थ्यांची वर्गातील वाढती संख्या मूल्यसंक्रमणाच्या मार्गातील अडचण आहे हे अध्यापकांचे म्हणणे मान्य करावे लागते. कारण माध्यमिक शाळांमधून ४० ते ६० विद्यार्थी संख्या असलेले वर्ग असतात. मोठ्या माध्यमिक शाळांमधून तर ७० ते ७५ विद्यार्थी संख्या असलेली पहावयास मिळते. अशा बहुसंख्य विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमण करण्यासाठी आवश्यक असणारा वेळ अध्यापकांकडे असत नाही. दुसरे असे की मूल्यसंक्रमण झाले किंवा नाही याचे निरीक्षण, अवलोकन व परीक्षण करणेही यामुळे शक्य नाही. म्हणून वर्गांमध्ये मर्यादित विद्यार्थी संख्या असणे अत्यंत गरजेचे आहे. वर्गात जे जास्तीतजास्त २० ते २५ विद्यार्थी संख्या ही मूल्य शिक्षणासंबंधात योग्य मानता येईल. पण अफाट लोकसंख्या असणाऱ्या भारतासारख्या देशाच्या सामाजिक, आर्थिक अवस्थेचा विचार करता वर्गामध्ये २० ते २५ विद्यार्थी संख्या ठेवणे शासनाला विकसनशील देशात परवडणारे नाही. त्यामुळे ही संख्या जास्तीतजास्त ४० असावी.

विद्यार्थ्यांना आजकालची बाह्य आकर्षणे आकर्षित करतात. (टी.व्ही., रेडिओ, सिनेमा, व्ही.डी.ओ.) ही ज्या प्रमाणात

ही असले तरी, या साधनांचा एक उत्कृष्ट शैक्षणिक साधन म्हणून कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार केला पाहिजे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना या आकर्षणापासून परावृत्त करायचे असेल तर शिक्षण पद्धती, अध्यापन पद्धतीही अत्यंत उपयुक्त आणि विद्यार्थ्यांना आकर्षण करून घेण्यास योग्य अशी असली पाहिजे. स्वयंअध्ययनात विद्यार्थी रमत असल्यामुळे अशा पद्धतीचाही वापर यासाठी करता येईल.

तसेच अध्यापकांच्या संदर्भीय वाचनातील कमतरतेमुळे अध्यापन नीरस, कंटाळवाणे होणे शक्य असते. आणि अशा नीरस अध्यापनामुळे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होणे स्वाभाविक असते. म्हणून अध्यापकाने आपले ज्ञान अद्यावत ठेवणे फार गरजेचे आहे, तसेच अधिक वाचनाने आपला व्यासंग वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे अध्यापकाची जी सुस्पष्ट मनोभूमिका तयार होते ती मूल्यशिक्षण आणि संक्रमणाच्या संदर्भात महत्त्वाची मानली गेली पाहिजे.

सारणीतील अनुक्रमांक ८ ते ११ यांना प्रत्येकी एका अध्यापकाने (१ टक्के) प्रतिसाद दिलेला आहे.

शिक्षकाचे जीवन [illegible] व त्यागप्रधान आहे. असे एका अध्यापकाने म्हटले आहे. त्याचे म्हणणे पटणारे नाही. कारण नोकरीची शाश्वती, वेळेवर मिळणारे योग्य पगार, कालानुमाने मिळणारी पगारवाढ, पेन्शन योजना या सर्व नोकरी संदर्भातील गोष्टींचा विचार केला असता. शिक्षण व्यवसायामध्ये शिक्षकाला [illegible] स्थैर्य लाभलेले आहे हे मान्य केले पाहिजे.

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकाचे व्यक्तिमत्व आदर्श असावे असे एका अध्यापकाने नोंदविलेले आहे. हे त्याचे म्हणणे पटणारे आहे, त्याचे

मूल्यसंक्रमण करायचे तेच मूल्यहीन जीवन जगत असला, तर मुलांच्या सूक्ष्म निरीक्षण दृष्टीतून त्याचे वर्तन सुटत नाही.

" लोकांसांगे ब्रह्मज्ञान,
आपण मात्र कोरडे पाषाण "

असा अध्यापकांबद्दल विद्यार्थ्यांचा विश्वास उडतो व विद्यार्थी संभ्रमावस्थेत पडतो. कारण विद्यार्थी केवळ अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अवलोकन करीत नसतो, तर त्याच्यातील बारीकसारीक गोष्टींचे देखील अवलोकन करीत असतो. यातून अनेक श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या अवलोकनाने मूल्यत्वाची जाण त्याला येऊ लागली असते आणि त्याची या संदर्भातील मनोभूमिका

" मूल्य ज्यांनी त्या शोधावे
मूल्य हे काय आहे ?
मूल्यांची कला शोधावे
म्हणे अमूल्य आहे । "[१]

अशी झालेली असते. त्यामुळे मूल्यहीन शिक्षकाबद्दल त्याचा विश्वास उडून जातो व त्याच्या सोबतच तो दुसरे व्यक्तिमत्त्व न्याहाळू लागतो. म्हणून अध्यापकाने आपले व्यक्तिमत्त्व आदर्श ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

सुधारणेचा नवा आग्रह धरला असे एका अध्यापकाने म्हटले आहे. परंतु त्याचे हे म्हणणे शिक्षण व्यवसायाच्या ओझ्याच्या भारातून निर्माण झाले आहे असे स्पष्ट नमूद करावेसे वाटते.

शासन प्रशासन व पालकांकडून मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात प्रोत्साहन मिळत नाही असे एका अध्यापकाने मत नोंदविले आहे. जरी शासनाकडून व पालकांकडून या संदर्भात प्रोत्साहन मिळत नसले तरी अध्यापकाने मूल्यसंक्रमण करणे हे कोणाच्या प्रोत्साहनावर अवलंबून असू नये असे नमूद करावेसे वाटते.

शिक्षणक्रमात अपेक्षेपेक्षा अधिक विषय शिकवले जातात. यामुळे मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष होते असेही एका अध्यापकाने आपले मत नोंदविले आहे. अर्थात 'मूल्य' म्हणजे विषयवार शिकविण्याचा विषय नव्हे तर मूल्य शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांची विशिष्ट मनोभूमिका तयार करणे होय हे आपण जाणले पाहिजे. आणि ही मनोभूमिका कोणताही विषय शिकवत असताना शिक्षक घडवू शकतो हे अध्यापकाने लक्षात घेतले पाहिजे.

अध्यापकांना वाढलेल्या तासणी कामामुळे मूल्यमापन काळजीपूर्वक केले जात नाही असे एका अध्यापकाने मत नोंदविले आहे. त्यांचे काम वाढले आहे हे म्हणणे खरे असले तरी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन आपण त्यांच्या कामातून करत असतो हे लक्षात घेतले पाहिजे. विशिष्ट विद्यार्थ्यांनी केवळ लिहून दिलेले गृहपाठ अध्यापकाने काळजीपूर्वक तपासावेत अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा असते. त्या दृष्टीने ती अध्यापकांकडे पडत असते.

सुधारणावादी अभ्यासक्रम आणि तणावमुक्त शिक्षक यांच्यातील वैचारिक संघर्ष आशयपूर्वक मूल्यसंक्रमण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आड येतो असे एका अध्यापकाने आपले मत नोंदविले आहे. ज्याने शिक्षक व्हायचे त्याने त्या व्यवसायाची आचारसंहिता पाळणेही गरजेचे असते. मूल्य-संक्रमणाच्या संदर्भात अध्यापकाची अध्यापनातील तात्त्विक भूमिका जर आड येत असेल तर ती आचारसंहितेचा भंग आहे असे वर्तन करते, असे म्हणावे लागेल. कारण विद्यार्थ्यांवर आपली मते लादू नयेत असे आचारसंहिता सांगते. अध्यापकाने आपले अध्यापन हे निःपक्ष बुद्धीने आणि मनाने करीत राहणे यातच त्याच्या मोठेपणाची साक्ष आहे. सुधारणावादी अभ्यासक्रमाला सामोरे जात जात संस्कृतीची उत्तम मूल्यांचे जतन करणे आणि त्यांचे संक्रमण करणे हे आदर्श अध्यापकाचे कर्तव्य ठरते याचे भान ठेवले पाहिजे.

निःस्पृह व ध्येयवादी शिक्षकांचा अभाव ही वास्तवपूर्वक मूल्य-संक्रमण करण्यासाठी अडचण आहे असे एका अध्यापकाला वाटते.

"उत्कर्षाच्या ठायी
निष्कामाचा भाव
कष्टाळ कर्ता
निःस्पृहीन ।"[२]

ही अपेक्षा: खरी आहे. ध्येयवादी व्यक्तीशिवाय कोणतेही कार्य सिद्धीस जाऊ शकत नाही. म्हणून अध्यापकांनी ध्येयनिष्ठ असण्याची अत्यंत गरज आहे.

अध्यापक व विद्यार्थी यांच्यातील कृतीशून्यतेमुळे वास्तवपूर्वक मूल्य-संक्रमण होत नाही असे एका अध्यापकाला वाटते. पुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये अध्यापक व विद्यार्थी यांनी कृतीमध्ये आणली पाहिजेत. पण तसे पहावयास मिळत नसल्याचे या अध्यापकाचे म्हणणे आहे. हे म्हणणे काही अंशी मान्य करावे लागते.


राष्ट्रीय शिक्षण धोरणाचीयोग्य अंमलबजावणी होत नाही त्यामुळे वास्तविकपूर्वक मूल्ये संक्रमित होत नाहीत असे एका अध्यापकाला वाटते. कोणत्याही धोरणाच्या कार्यवाहीवर त्या धोरणाची यशस्वीता अवलंबून असते. शासनाकडून मूल्यसंक्रमणासाठी म्हणून आयोजित करण्यात येत असलेले शासकीय कार्यक्रम हे उद्दिष्ट हरवून बसले व केवळ उपचार म्हणून पार पडत असलेले पहावयास मिळतात. त्या कार्यक्रमापाठीमागील भूमिका आणि गांभीर्य अध्यापक आणि विद्यार्थीही विसरलेले पहावयास मिळतात. समाजामध्ये नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या अवमूल्यनाच्या पाठीमागील एक कारण म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (१९८४-८६) अपेक्षेनुसार न झालेली अंमलबजावणी होय असे आम्हाला म्हणता येते. कारण "नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा विकास"[३] हे राष्ट्रीय शिक्षण आयोगाचे एक उद्दिष्ट आहे.

शिक्षकाच्या आवडीचा विषय अध्यापकांना मिळतोच असे नाही. त्यामुळे अध्यापनात रस कमी असल्याने काळजीपूर्वक मूल्यसंक्रमण होऊ शकत नाही असे एका अध्यापकाने मत नोंदविले आहे. हे त्यांचे मत पटणारे नाही. ' लागेल तर तुपाशी, नाही तर उपाशी । ' ही अध्यापकाची वृत्ती त्याची संकुचित मनोवृत्ती दर्शविते. संकुचित मनोवृत्ती धारण करणारा अध्यापक ' अध्यापक ' या संज्ञेस अपात्र असतो. दुसरे असे की, विषय नावडता मिळाला म्हणून मूल्यसंक्रमण करण्यामध्ये काही अडसर येतो हे म्हणणेही पटत नाही. कारण कोणताही विषय-अध्यापक आपापल्यापरीने मूल्यसंक्रमण करू शकतो.

अध्यापकांचा पुरेशी अवकाश कमी त्यामुळे काळजीपूर्वक मूल्यसंक्रमण होत नाही असे एका अध्यापकाला वाटते. अध्यापकांचा पुरेशी अवकाश कमी हे आधुनिक शिक्षणपद्धतीचे एक वैशिष्ट्य दिसते. आज तरी त्यावर उपाय दृष्टिपथात नसला तरी अध्यापक मूल्यसंबंधीत विशिष्ट वेळा अवलंबित नेतो विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करू शकतो हे खरे आहे. त्यामुळे मिळालेल्या अवकाशाचा अध्यापक कसा उपयोग करून घेतो हे महत्त्वाचे आहे. तसेच विद्यार्थी अध्यापकांचा अवकाश कसा वाढेल याकडेही शिक्षणपद्धतीने लक्ष देणे आवश्यक आहे.

मूल्यांचे संक्रमण विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात होते याचा शोध घेण्याच्या निमित्ताने प्रश्न क्र. ८ ची योजना केलेली होती. त्यासाठी ' आपण संक्रमित करू इच्छिणारी मूल्ये किती प्रमाणात संक्रमित होतात ? ' हा वैकल्पिक प्रश्न विचारण्यात आलेला होता. त्यासाठी पाच वेगळी विधाने दिलेली होती. प्रत्येक वेगळ्या विधानापुढे मान्य असल्यास बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी विधानांना दिलेला प्रतिसाद वारंवारितेच्या खालील सारणीमध्ये नोंदविला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण होण्याचे प्रमाण
सारणी क्रमांक ५.१२ नुसार




प्रमाण :
२ से.मी. = १० अध्यापकांचा प्रतिसाद

A-1
paper products
Bombay

## सारणी क्र. ५.१२

### विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचे संक्रमण होण्याचे प्रमाण

| अनु. | मूल्य व संक्रमणाची श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | फार मोठ्या प्रमाणात | ३ | ३ |
| २. | मोठ्या प्रमाणात | १४ | १४ |
| ३. | अत्यल्प " प्रमाणात | १२ | १२ |
| ४. | अल्प प्रमाणात | ६४ | ६९ |
| ५. | अजिबात संक्रमित होत नाहीत | २ | २ |

वरील सारणीतील अनुक्रमांक १, २, अनुसार मूल्ये फार मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात व मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात या विधानांना ९५ अध्यापकांपैकी १७ अध्यापकांनी (१७ टक्के) होकारार्थी प्रतिसाद नोंदवलेला आहे. हा प्रतिसाद एकूण ९५ अध्यापकांचा विचार करता ०.२७ पेक्षाही कमी असल्याने त्याचा या ठिकाणी अधिक विचार करण्याचे कारण दिसत नाही.

सारणीतील अनुक्रमांक ५ – मूल्ये अजिबात संक्रमित होत नाहीत या विधानाला २ अध्यापकांनी (२ टक्के) प्रतिसाद दिला आहे. त्यांचा हा प्रतिसाद शंकास्पद वाटतो. कारण मूल्यसंक्रमण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून ती सतत विद्यार्थ्यांच्या संदर्भात चालू असते. विद्यार्थ्यांमध्ये त्यामुळे कार्हींना काही मूल्यसंक्रमण हे होत राहतेच. कारण विद्यार्थी म्हणजे मातीच्या पाषाणाचे गोटे नव्हेत की ज्यांच्यावर काहीच परिणाम होत नाही.

सारणीतील अनुक्रमांक ३ – " मूल्ये अत्यल्प प्रमाणात संक्रमित होतात आणि अनुक्रमांक ४ – " अल्प प्रमाणात संक्रमित होतात " या विधानांना ९५ पैकी अध्यापकांनी (८१ टक्के) होकारार्थी प्रतिसाद नोंदवलेला आहे. याचा अर्थ मूल्यांचे संक्रमण फार मोठ्या प्रमाणात होत नाही हे अध्यापकांच्या

फार मोठ्या संख्येने (८१ टक्के) मान्य केले आहे.

हे मूल्य शिक्षण फार मोठ्या प्रमाणात का होत नाही आणि असे फार मोठ्या प्रमाणात अध्यापक का मानतात हे जाणून घेण्याच्या दृष्टीने पुढील प्रश्न क्र. १ ची योजना केलेली होती.

प्रश्न क्रमांक १ - " विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजविली जात नसतील तर त्याची कारणे कोणती ? " हा होता. या मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. ९१ अध्यापकांपैकी ८० अध्यापकांनी (८८ टक्के) या प्रश्नाला प्रतिसाद देऊन विविध कारणांची नोंद केलेली होती. उपलब्ध तक्त्याच्या आधारे अभ्यासून त्या आशयाचे प्रतिसाद विशिष्ट विधानांसाठी एकत्र केलेले आहेत. ती विधाने आणि त्यांची वारंवारिता खालील सारणीमध्ये नोंदविली आहे.

## सारणी क्र. ५.११

**मूल्ये मोठ्या प्रमाणात क्षयित न होण्यामागील कारणे**

| अनु. | मूल्य क्षरण न होण्यामागील कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सामाजिक परिसर व सामाजिक वातावरणाचा परिणाम | ४८ | ८० |
| २. | परीक्षा हे एकमेव ध्येय | १४ | २३ |
| ३. | प्रसार माध्यमे व मनोरंजनाची साधने यांचा प्रभाव | १४ | २३ |
| ४. | प्रभावी अध्यापन व त्यासाठी अध्यापकांचा अभाव | ७ | १२ |
| ५. | अध्यापक व विद्यार्थी यांचा संवाद कमी | ५ | ८ |
| ६. | वर्गातील विद्यार्थी संख्येचे प्रमाण अधिक | ५ | ८ |
| ७. | मूल्यांचे मूल्यमापन परीक्षेत नाही | ४ | ७ |
| ८. | विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कमी | ४ | ७ |
| ९. | मूल्याधिष्ठित अध्ययन अध्यापन नाही | ४ | ७ |
| १०. | केवळ उपचार म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन | २ | ३ |
| ११. | अशिक्षित व अज्ञानी पालक | १ | २ |
| १२. | पैशाचा अभाव | १ | २ |

सारणीतील अनुक्रमांक १ – ` सामाजिक परिसर व सामाजिक वातावरणाचा परिणाम ` या कारणास ६० अध्यापकांपैकी ४८ अध्यापकांनी (८० टक्के) होकारार्थी प्रतिसाद नोंदविला आहे. बहुसंख्य अध्यापकांनी नोंदविलेला हा प्रतिसाद मान्य करावा लागतो. या संदर्भातील विवेचन सारणी ५.५.११

मधील अनुक्रमांक १ तक्त्यात पृष्ठ क्र. १११,११२,११३वर केलेले आहे द्विरुक्ती टाळण्यासाठी ते याठिकाणी पुन्हा दिले नाही.

सारणीतील अनुक्रमांक २ व ३ यांना प्रत्येकी १४ अध्यापकांनी (२३ टक्के) प्रतिसाद नोंदविला आहे. अनुक्रमांक २ – परीक्षा हे एकमेव ध्येय मानल्याने मूल्यसंक्रमण होत नाही – असे म्हटले आहे. जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी परीक्षा या अनिवार्य आहेत हे जरी खरे असले तरी उत्तम जीवन जगणे हे माणसाच्या जीवनाचे ध्येय आहे हे विसरून चालणार नाही. माणसाच्या जीवनाची यशस्विता ही केवळ शाळेमधून घेणाऱ्या परीक्षांमधून ठरत नाही, तर ती त्याच्या कर्तृत्वातून, वर्तनातून, स्वभावातून आणि जीवन-प्रणालीतून प्रकट होत असते. म्हणून केवळ परीक्षार्थी होणे हे विद्यार्थ्यांचे ध्येय संकुचित स्वरूपाचे आहे हे मान्य करावे लागते. दुसरे असे की, परीक्षांना महत्त्व देत असताना मूल्यसंक्रमणाकडे दुर्लक्ष करावे असेही म्हणायचे वाटत नाही.

अनुक्रमांक ३ तक्त्यातील विवेचन सारणी क्रमांक ५.११ मधील अनुक्रमांक ४ च्या तक्त्यात पृष्ठ क्रमांक ११४ वर आलेले आहे. म्हणून येथे दिलेले नाही.

अनुक्रमांक ४ – प्रभावी अध्यापन व त्यासाठी अध्यापकांचा अभाव या कारणाला ७ अध्यापकांनी (१२ टक्के) प्रतिसाद दिला आहे. अनुक्रमांक ५, विद्यार्थी व अध्यापक यांचा संवाद कमी, अनुक्रमांक ६ – वर्गातील विद्यार्थी संख्येचे प्रमाण अधिक या कारणांना प्रत्येकी ५ अध्यापकांनी (८ टक्के) होकारार्थी प्रतिसाद दिला आहे. अनुक्रमांक ७ – मूल्यांचे मूल्यमापन परीक्षेत नाही. अनुक्रमांक ८ – विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कमी, आणि अनुक्रमांक ९ – मूल्याधिष्ठित अध्ययन-अध्यापन नाही या तीन कारणांना प्रत्येकी ४ अध्यापकांनी (७ टक्के) प्रतिसाद नोंदविला आहे. तसेच अनुक्रमांक १० – केवळ उपचार म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या कारणाला २ अध्यापकांनी

(३ टक्के) आणि अनुक्रमांक ११ – अशिक्षित व अज्ञानी पालक व अनुक्रमांक १२ – कैवा अभाव या कारणांना प्रत्येकी १ अध्यापकाने (२ टक्के) प्रतिसाद नोंदविला आहे.

अनुक्रमांक ४ ते १२ यांना मिळालेला प्रतिसाद हा सरासरी (५ टक्के) आहे. हा प्रतिसाद अल्प असला तरी ही कारणे देखील मूल्य संक्रमण न होण्या-मागील महत्त्वाची कारणे आहेत हे नमूद करावेसे वाटते. अनुक्रमांक ४ संबंधीचे विवेचन सारणी क्र. ५.९ मधील अनुक्रमांक २ व ३ च्या संदर्भात पृष्ठ क्रमांक वर आलेले आहे. तसेच अनुक्रमांक ५ च्या संदर्भातील विवेचन सारणी क्र. ५.११ मधील अनुक्रमांक १८ च्या संदर्भात पृष्ठ क्रमांक ११६ वर आलेले आहे.

अनुक्रमांक ६ मध्ये वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याने मूल्यसंक्रमण होत नाही असे अल्पसंख्य (८ टक्के) अध्यापकांनी नमूद केले असले तरी त्यांचे हे म्हणणे काही प्रमाणात मान्य करावे लागते. नेहमीच्या शाळांतून असणारी वर्गातील ७० ते ७५ विद्यार्थी संख्या, अध्यापकाने कुणाकडेही पूर्णपणे लक्ष न देण्यास कारणीभूत ठरू शकते. अध्यापकांचा व्यक्तिगत संबंध येणे मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने गरजेचे असते. या दृष्टीने विचार केल्यास वर्गातील विद्यार्थी संख्या ही २० ते २५ च्या दरम्यान असणे संयुक्तिक वाटते. पण भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शिक्षणक्षेत्रातील आर्थिक तरतूद आणि लोकसंख्येचे वाढते प्रमाण लक्षात घेता वर्गातील विद्यार्थी संख्या ही ४० पर्यन्त असण्यास हरकत नसावी असे सुचवावेसे वाटते.

अनुक्रमांक ७ – 'मूल्यांचे मूल्यमापन परीक्षेत नाही' त्यामुळे मूल्य संक्रमण होत नाही हे म्हणणेही काही अंशी मान्य करावे लागते. विद्यार्थी हा परीक्षार्थी होत. असल्याने परीक्षेचाच उपयोग मूल्यसंक्रमणासाठी करून घेणे हेही हिताचे ठरणारे आहे. अर्थात त्यासाठी परीक्षा पद्धतीचे स्वरूप

आपल्याला बदलावी लागेल. केवळ स्मरण चाचणी म्हणून परीक्षा घेऊन चालणार नाही, तर मूल्यांवर आधारित प्रश्नांची योजनाही परीक्षेमध्ये करावी लागेल. केवळ लेखी परीक्षेला महत्त्व न देता तोंडी परीक्षा आणि विद्यार्थ्यांचे वर्गातील काम आणि वर्तन निरीक्षण करून त्याची नोंद प्रगतीपुस्तकामध्ये केली गेली, तर मूल्यशिक्षणाकडे विद्यार्थी थोडे अधिक गांभीर्याने पाहतील असे म्हणता येते.

अनुक्रमांक ८ – ` विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कमी ` हे एक कारण काही अध्यापकांनी (७ टक्के) दिले आहे. तेही काही अंशी मान्य करावे लागते. कारण ` ग्रंथ हेच खऱ्या अर्थाने गुरु ` ठरत असतात. संस्कारक्षम वयामध्ये संस्कारयुक्त पुस्तकांचे वाचन मुलांकडून झाल्यास त्यांच्या अंतर्मनात संस्कार बीज अप्रत्यक्षरीत्या रुजले जाते आणि ते जोपासणे सोयीचे होते. त्यासाठी शालेय ग्रंथालयाचा योग्य वापर, विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांची नोंद, त्यावर घडवून आणली गेलेली चर्चा, ग्रंथपेटी योजनेचा वापर, यासारखे उपक्रम आपल्याला योजता येतील व विद्यार्थ्यांची अवांतर वाचनाची आवड वाढवता येईल.

अनुक्रमांक ९ – ` मूल्याधिष्ठित अध्ययन, अध्यापन नाही ` त्यामुळे मूल्यसंक्रमण होत नाही असे काही (७ टक्के) अध्यापकांचे म्हणणे आहे. मूल्यशिक्षणाकडे मुलांचे व अध्यापकांचे होणारे दुर्लक्ष याठिकाणी जाणीवपूर्वक विचारात घेऊन त्यानुसार आपल्याला मूल्याधिष्ठित अध्ययन अध्यापनाचे नियोजन केले पाहिजे.

अनुक्रमांक १० – ` केवळ उपचार म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे होत असलेल्या आयोजना ` मुळे त्यामागील निकोप हेतूच नष्ट होऊन जातो. त्यासाठी हेतुपूर्वक कार्यक्रमाचे कार्यक्रमातील गांभीर्य राखून सांस्कृतिक उपक्रम पार पाडणे गरजेचे आहे. त्यांचे आयोजन उद्दिष्टानुसार करून ती उद्दिष्टे साध्य होतात की नाही याचे मूल्यमापनही आपण केले पाहिजे.

अनुमान ११ - ' अशिक्षित व अज्ञानी पालकांमुळे मूल्य संक्रमण होत नाही ' असे मत (२ टक्के) अध्यापकांनी व्यक्त केले आहे. परंतु अशिक्षित पालक मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात अधिक दक्ष असण्याची शक्यता असते. ती शिक्षित नसला तरी आपल्या पाल्यांने कसे वागावे या संदर्भातील त्यांच्या स्पष्ट कल्पना पाल्यांमध्ये मूल्यसंक्रमण करू शकतात. दुसरे असे ' अज्ञानी पालक ' याचा जो अर्थ घेताना मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अज्ञानी असा घ्यावा लागतो. आणि असा तो घेतला म्हणजे, का सुशिक्षित देखील मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अज्ञानी पालक असू शकतो याचे भान ठेवले गेले पाहिजे.


अनुमान १२ - ' पैसा अभाव हे मूल्यसंक्रमण न होण्याचे कारण मान्य होणारे नाही. कारण स्वतः शिक्षक आपल्या अध्यापनातून सादा पुढे असा उभा करतो की त्याच्या आचरणातून त्या प्रसंगातील ' मूल्य ' विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात रुजू लागते. म्हणून तातडीने अध्यापकाने अध्ययन अनुभव देत राहणे हे महत्त्वाचे ठरते.

### ५.४ मूल्यशिक्षण संदर्भात अध्यापकांचा कृतीसत्रातील सहभाग :

पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये योग्य पध्दतीने विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी मूल्यांसंदर्भात अध्यापकांना काही मार्गदर्शन झाले की नाही, त्यांचे काही प्रशिक्षण झाले आहे की नाही हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीमध्ये प्रश्न ९, १०, १०अ, आणि १० ब ची योजना केली होती. अध्यापकांनी नोंदविलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण खाली केले आहे.

मूल्यशिक्षण शिबीरामध्ये अध्यापकांचा सहभाग

सारणी क्रमांक ५.१४ नुसार




आकृतीतील क्रमांक सारणी क्रमांक ५.१४ मधील अनुक्रमानुसार

कृती सत्रामध्ये सहभागी अध्यापक १७ टक्के

कृतीसत्रात सहभागी न झालेले अध्यापक ८३ टक

A-1
paper products
Bombay

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अध्यापकांचे प्रशिक्षण झाले आहे काय, त्यांना शिबीरातून, कृतिसत्रातून काही मार्गदर्शन मिळाले आहे काय हे जाणून घेण्याच्या इच्छेने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १०, यांची योजना केलेली होती. प्रश्न क्रमांक १० - `मूल्य शिक्षणाच्या संदर्भात आपण एखाद्या कृतिसत्रास हजर राहिला आहात का ?` हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. या प्रश्नाला दिलेल्या होय-नाही या पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद सारणीबद्ध खालील सारणी मध्ये नोंदविला आहे.

<u>सारणी क्र.५.१४</u>

<u>मूल्य शिक्षण शिबीरामध्ये अध्यापकांचा सहभाग</u>

| अनु. | होय-नाही | अध्यापकांचा प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | होय | १६ | १७ |
| २) | नाही | ७९ | ८३ |

वरील सारणी क्र. ५.१४ मध्ये नोंद झालेल्या अध्यापकांच्या प्रतिसादावरून असे अनुमान काढता येते, की एकूण ९५ अध्यापकांपैकी मूल्यशिक्षण शिबीरामध्ये सहभाग घेतलेल्या अध्यापकांची संख्या १६ (१७ टक्के) आहे. ज्यांनी अशा शिबीरातून कधीच भाग घेतला नाही, अशा अध्यापकांची संख्या ७९ (८३ टक्के) आहे.

या वस्तुस्थितीवरून असे म्हणता येते की, मूल्यशिक्षण शिबीरात सहभागी होणाऱ्या अध्यापकांची संख्या एकूण अध्यापक संख्येच्या ०.२० पेक्षाही कमी आहे आणि हे प्रमाण अल्पतम आहे.

प्रश्न क्रमांक १०.ब -

मूल्यशिक्षण संदर्भात अध्यापकांनी ज्या शिबीरांमधून व ज्या कृतिसत्रांतून भाग घेतला होता त्या कृतिसत्रांचे-शिबीरांचे स्वरूप कळावे म्हणून प्रश्न क्रमांक १० ब ची योजना केली होती. अध्यापकांना या संदर्भात १) कृतिसत्राचे नाव, २) आयोजक, ३) कालावधी, ४) नेमके कोणते प्रशिक्षण या संदर्भात माहिती विचारण्यात आली होती. ९५ पैकी १८ (१७ टक्के) अध्यापकांनी माहिती भरून दिली होती. ती खालील सारणी क्रमांक ५.१५ मध्ये नोंदविलेली आहे.

सारणी क्र. ५.३५

अध्यापकांनी सहभाग घेतलेल्या मूल्यशिक्षण कृतिसत्र-शिबिर माहिती

| अनु. | कृतिसत्र-शिबीराचे नाव | सहभागी अध्यापक | आयोजक | कालावधी | नेमके कोणते प्रशिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिबीर | ४ | जिल्हा परिषद शिक्षण खाते, कोल्हापूर | १० दिवस | विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आवश्यक ती नैतिक, सामाजिक, शैक्षणिक मूल्ये कशाप्रकारे रूजवावीत याविषयी प्रशिक्षण |
| २. | नैतिक मूल्यांचे संक्रमण | १ | शिक्षण खाते, महाराष्ट्र राज्य | १ दिवस | नैतिक मूल्यांचे संक्रमण कसे करावे |
| ३. | निरंतर मराठी शिबीर | २ | राजाराम कॉलेज, कोल्हापूर | ८ दिवस | गोष्टी वैगेरे, फारसे नवीन काही नाही. पाठात नसलेला पण उपयुक्त भाग विद्यार्थ्यांना कसा शिकवावा या संबंधात थोडे मार्गदर्शन |

| अनु. | कृतिसत्र-शिबीराचे नाव | सहभागी अध्यापक | आयोजक | कालावधी | नेमके कोणते प्रशिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| ४. | पाठ्यपुस्तक चर्चासत्र | २ | जि.प.शिक्षण खाते, कोल्हापूर | ८ दिवस | शाळातील मूल्यांवर आधारीत अध्यापन पद्धती |
| ५. | वाकुडी नोव्हेंबर ८९ | १ | -अनेकांत शिक्षापीठ<br>-वाकुडी विद्यापीठ<br>-मुख्याध्यापक संघटना<br>-शिवाजी विद्यापीठ | १ दिवस | नेमके सांगणे कठीण, पण काही परिणामकारक मिळाले |
| ६. | मराठी अध्यापन कसे करावे | १ | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था | ५ दिवस | पाठ्यपुस्तक शिकवत असताना मुलांच्यामध्ये प्रेम, आवड, जिज्ञासा कशी निर्माण करावी हे ज्ञान मिळाले |
| ७. | मराठीचे कृतिसत्र | १ | जि.प.शिक्षण खाते सिंधुदुर्ग | २ दिवस | साहित्याची ओळख मुलांना करून दिल्यास मुलांची वाढ व आणखी लोकांना या संदर्भात मार्गदर्शन |
| ८. | मूल्यवर्धन कृतिसत्र | ३ | महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर | ३ दिवस | पाठ्यपुस्तकातील शाळातील मूल्यांचा शोध मूल्यसंवर्धनाच्या बाबतीत त्याच पाठ मूल्यशोधन व संवर्धन संदर्भात तज्ज्ञांच्या बाबत |
| ९. | संस्कृत शिबीर | १ | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे | ७ दिवस | विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्यासाठी शिक्षकही सुसंस्कारीत असणे महत्त्वाचे या संदर्भात त्यांच्या तज्ज्ञांच्या मुलाखती. |

९५ अध्यापकांच्या अनुभवाचा विचार करता सरासरी अनुभव १८ वर्षे आहे. (पाहा सारणी क्रमांक ५.५). १८ वर्षे सरासरी अनुभव असणाऱ्या अध्यापकांपैकी केवळ १६ अध्यापकांनी (१७ टक्के) मूल्यशिक्षण शिबीरांमध्ये सहभाग घेतला आहे व या दरम्यान केवळ नऊ शिबीरांचे आयोजन केले गेले आहे हे नमूद करावेसे वाटते. कृतिसत्र-शिबीरांचे हे प्रमाण अत्यल्प आहे.

तसेच वरील सारणीतील अनुक्रमांक २, ५, ८ ही शिबीरेच फक्त मूल्यशिक्षणाशी प्रत्यक्ष संबंधित आहेत हे प्रमाण घेतलेल्या ९ शिबीरांचा विचार करता (३३ टक्के) आहे. अनुक्रमांक १ – हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात घेतलेले शिबीर आहे. आणि अनुक्रमांक ३,४,६,७ ही शिबीरे भाषाविषयांच्या अध्यापनाचा अधिक विचार करण्यासाठी घेतलेली आहेत. अनुक्रमांक ९ हे संस्कृत भाषा अध्यापनासंदर्भातील शिबीर आहे.

शिबीरे कोणी आयोजित केलीत त्या संदर्भात वरील सारणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अनुक्रमांक १, २, ४,७ आणि ९ शिबीरे शिक्षण खात्याकडून आयोजित करण्यात आलेली आहेत. अनुक्रमांक ३ – हे राजाराम कॉलेज, कोल्हापूर यांनी तर अनुक्रमांक ५ – हे [illegible], [illegible] विद्यापीठ, मुख्याध्यापक संघटना, शिवाजी विद्यापीठ यांनी संयुक्तरीत्या एक दिवसाचे शिबीर घेतले आहे. अनुक्रमांक ६ – निरंतर शिक्षण संस्थेने शिबीर घेतले असून अनुक्रमांक ८ – विस्तार सेवा योजना, महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालयाने आयोजित केले आहे. अनुक्रमांक ९ हे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने आयोजित केलेले शिबीर आहे. याचा अर्थ शिक्षण खाते, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून मूल्यशिक्षण संदर्भात शिबीरांचे आयोजन अल्प प्रमाणात झालेले आहे.

तसेच शिबीरांचा कालावधी १ दिवसापासून ते १० दिवसांपर्यन्त असल्याचे दिसून येते.

मूल्यशिक्षण कृतिसत्र-शिबीर अधिक परिणामकारक कसे होईल या संदर्भात शोध घेण्याच्या भूमिकेतून प्रश्न क्रमांक १० ५ ची योजना केली होती. कृतिसत्र अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने अध्यापकांकडून सूचना मागविलेल्या होत्या. खालील सारणीमध्ये अध्यापकांनी दिलेल्या सूचनांचे वर्गीकरण उत्तराच्या आधारे त्यात आलेल्या सूचना एका विधानात समाविष्ट करून त्या विधानांना अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद शेकडेवारीसह नोंदविला आहे.

<u>सारणी ३.५.१६</u>

मूल्यशिक्षणाचे कृतीसत्र परिणामकारक होण्यासाठी
केलेल्या सूचनांचे वर्गीकरण
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनु. | सूचना | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आयोजन व प्रेरणा निश्चित स्वरूपाची असावी. | १० | ६२ |
| २. | कृतीसत्रासाठी कालावधी पुरेसा असावा | ३ | १९ |
| ३. | अनुभव कथन व प्रात्यक्षिक यावर | १ | ६ |
| ४. | अध्यापकांना कृतीसत्रे अत्यावश्यक करावीत | १ | ६ |
| ५. | अध्यापकांची संख्या मर्यादित असावी | १ | ६ |
| ६. | रुची व क्षमता असणाऱ्यांना अधिक संधी द्यावी. | १ | ६ |

ज्या अध्यापकांनी (१६) शिबीरामध्ये भाग घेतला त्या अध्यापकांनी सूचना नोंदविल्या आहेत. वरील सारणीतील अनुक्रमांक १ - आयोजन व प्रेरणा निश्चित स्वरूपाची असावी अशी सूचना १० अध्यापकांनी (६२ टक्के) केली

आहे. ही त्यांची सूचना मान्य करावयास हरकत नसावी. कारण शिबीरांच्या यशासाठी शिबीरांमधून होत असलेली वेळ पाळण्याची, कृतिसत्राच्या समारोपाचे प्रशस्तीपत्र मिळावे यासाठी पाळलेली धडपड, संबंधित शिबीरामध्ये केवळ हजेरी लावून प्रत्यक्षात हजर न राहण्याचे वाढते प्रमाण, शिबीरांमधून पुढाकार घेऊन घडणाऱ्या व्यापक, मुक्त चर्चा अभाव, शिबीर आयोजकांचे आपले पुढारीपण शिबीरार्थींच्यावर बिंबविण्याचा अट्टाहास यासारख्या गोष्टींमुळे शिबीर आयोजनाचा आत्माच हरवला जातो. त्यासाठी शिबीराचे आयोजन आणि प्रेरणा निश्चित स्वरूपाची असावी व त्या पद्धतीने कार्यवाही केली जावी हे अध्यापकांचे म्हणणे पटते. कारण अशाच शिबीरातून अध्यापक विशिष्ट भूमिका घेऊन शाळेमध्ये परत येत असतो. सुनियोजित शिबीरांमधून अनुभवी व तज्ञ प्रशिक्षित तज्ज्ञांकडून मार्गदर्शन दिले जाते. अत्यावश्यक तो कालावधी त्यासाठी निश्चित केला जातो. शिबीराचे गांभीर्य टिकून रहावे यासाठी आयोजक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतो. संबंधित सर्व साहित्याची उपलब्धता सिद्ध केलेली असते. शिबीरार्थींच्या राहण्याची जेवणाची सोय उत्तम ठेवलेली असते. शिबीरामध्ये कृतीशीलतेला अधिक वाव देऊन चर्चा घडवून आणली जाते आणि शिबीरामध्ये आपण काय मिळवले या संदर्भात अध्यापकास आपोआप स्वरूपाचे लेखन मार्गदर्शनासाठी दिले जाते. अशा स्वरूपाचे शिबीराचे नियोजन झाल्यास शिबीरांकडून अपेक्षित असणारी उद्दिष्टे साध्य होण्याची शक्यता असते.

सारणीतील अनुक्रमांक २ - ' कृतिसत्रासाठी कालावधी पुरेसा असावा ' ही सूचना ३ अध्यापकांनी (१२ टक्के) नोंदवली आहे. सारणी क्र. ५.१५ मध्ये शिबीरांची माहिती नोंदवलेली आहे. त्यामध्ये १ दिवसा-पासून ते १० दिवसापर्यंत शिबीरे आयोजित झाल्याचे दिसते.

मूल्यशिक्षण शिबीराचा कालावधी पुरेसा असावा ही सूचनाही त्यासाठी मान्य करावी लागते. मूल्यशिक्षणासारख्या अतिव्यापक असणाऱ्या विषयासंबंधीची शिबीरे हे एक दिवसाची ठेवणे म्हणजे त्या विषयावर व संबंधित शिबीरार्थींवर अन्याय करण्यासारखे ठरणारे आहे. तसेच एका दिवसाच्या शिबीरामधून मूल्यशिक्षणासंबंधात आपण काही मूलभूत आणि पायाभूत असे देऊही शकत नाही. म्हणून कालावधी ठरवत असताना शिबीराची उद्दिष्टे, त्यामध्ये घेण्यात येणारे उपक्रम (कृतीसत्रे, चर्चा, खेळ) या सर्वांचा विचार करून शिबीराचा कालावधी ठरवणे गरजेचे आहे. तो अधिक नसावा तसेच तो कमीही असू नये.

सारणीतील अनुक्रमांक ३ – अनुभव कथन व प्रात्यक्षिक यावर कृतीसत्र घ्यावे, अनुक्रमांक ४ – अध्यापकास कृतीसत्रे अत्यावश्यक करावीत, अनुक्रमांक ५ – अध्यापकांची संख्या मर्यादित असावी, अनुक्रमांक ६ – रुची व क्षमता असणाऱ्यांनाच अधिक संधी द्यावी अशा सूचना प्रत्येकी एका अध्यापकाने (६ टक्के) केलेल्या आहेत.

मूल्यशिक्षणाच्या शिबीरासंबंधात अनुक्रमांक ३,४,५ या नोंदवलेल्या सूचना मान्य कराव्या लागतील. कारण शिबीरातून मूल्यसंक्रमण संबंधातील तज्ञांचे अनुभव शिबीरार्थींना निश्चितच मार्गदर्शक ठरणारे आहेत. तसेच प्रत्यक्ष कृती किंवा उपक्रमांमधून मूल्यांचे संक्रमण कसे करावे याचे मार्गदर्शन होणेही गरजेचे आहे. मूल्यसंक्रमणामध्ये अध्यापक महत्त्वाचा घटक असल्यामुळे कृतीसत्रे अध्यापकांना अत्यावश्यक करावीत व शिबीरामध्ये योग्य अध्यापक संख्या असावी या सूचनाही शिबीर उद्दिष्टांच्या सफलतेसाठी मान्य कराव्या लागतात.

सारणीतील अनुक्रमांक ६ – रुची व क्षमता असणाऱ्यांनाच संधी द्यावी ही एका अध्यापकाने केलेली सूचना बरोबर असली तरी ज्यांच्याकडे रुची नाही म्हणून त्यांना संधी नाही देऊन चालणार नाही, तर रुची अधिक वाढविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे.

## ५.५ मूल्य व अध्यापकांचे व्यक्तिमत्व यांचा संबंध :

मूल्य, मूल्यसंक्रमण या संदर्भात अध्यापकांच्या व्यक्तिमत्वाचा कोणता परिणाम होतो हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्न क्र. ११, ११अ, ११ब, ११क ची योजना प्रश्नावलीमध्ये करण्यात आलेली होती. अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण व विश्लेषण प्रश्नानुसार खाली केले आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११ – 'पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करीत असताना अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम होतो का ?' हा होता. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. या प्रश्नाला दिलेल्या होय-नाही या दोन पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेले प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केला आहे.

सारणी क्र. ५.१७

अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाच्या परिणामाबाबत अध्यापकांचे मत

| अनु. | होय-नाही | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ९० | ९५ |
| २. | नाही | ५ | ५ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.२७ मध्ये नोंद झालेल्या अध्यापकांच्या प्रतिसादावरून असे अनुमान काढता येते की, ९५ पैकी ९० अध्यापकांच्या (९५ टक्के) मते मूल्यरुजवणाच्या संदर्भात अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम होतो. हे त्यांचे म्हणणे पूर्णांशाने मान्य करायला कोणतीही हरकत नसावी. कारण विनोबा भावेंनी म्हटले आहे -

" मोठ्या माणसांनी ज्ञान मावास
आईबापांनी मुलांस
पुढाऱ्यांनी अनुयायांस
गुरूने शिष्यास
कृतीने
उदाहरण घालून घायचे असते."[४]

अर्थात ही मार्गदर्शक कृती प्रत्येकाकडून घडायची असेल तर ती त्या त्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे. त्याशिवाय समोरच्या व्यक्तीच्या अंतर्मनात कृती संदर्भात आणि त्या व्यक्ती संदर्भात आदरभाव निर्माण होण्याची शक्यता असते. विद्यार्थी पंचेंद्रियांनी अध्यापकाला न्याहळत असतो. " मन " हे अत्यंत महत्वाचे आहे. मनाची संवेदनशीलता समोरील व्यक्तीच्या (इथे अध्यापकाच्या) अंतर्मनाचा वर्तनाचा शोध घेत असते. त्यावरून त्या व्यक्ती संदर्भातील आपले मत ठरवले जाते. मूल्यरुजवण करीत असताना अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा निश्चित स्वरूपाने विद्यार्थ्यांवर पडत असतो.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ११.ब - पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवित करीत असताना अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम होतो काय ? - उत्तर होय असल्यास कशाप्रकारे ? हा मुद्द स्वरूपाचा होता. या संदर्भात ९५ पैकी ९० अध्यापकांनी (९५ टक्के)

शीकरार्थी प्रतिसाद देऊन आपली मते नोंदविलेली आहेत. साधर्म्य तत्वानुसार मतांचे वर्गीकरण करून खालील सारणीमध्ये अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद नोंदवलेला आहे.

**सारणी क्र.५.१८**

**मूल्यशिक्षणावर अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभाव पाडणाऱ्या बाबींचे वर्गीकरण**

**प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार**

| अनु. | अध्यापकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पाडणाऱ्या गोष्टी | अध्यापक प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अध्यापकाचे चारित्र्य | ४१ | ५० |
| २) | अध्यापकाचा व्यासंग | २८ | ३४ |
| ३) | अंतःकरणपूर्वक प्रभावी अध्यापन | २५ | ३० |
| ४) | अध्यापकांचा दृष्टिकोन | १४ | १६ |
| ५) | अध्यापकांवरील विद्यार्थ्यांची श्रध्दा | ७ | ८ |
| ६) | अध्यापकांचे विद्यार्थ्यांशी असलेले संबंध | ४ | ४ |
| ७) | अध्यापकांचे प्रसन्न व उत्साही व्यक्तिमत्व | २ | २ |

सारणीतील अनुक्रमांक १ - अध्यापकांच्या चारित्र्याचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो असे ४१ अध्यापकांनी (५० टक्के) आपले मत नोंदविलेले आहे. सूर्य ज्याप्रमाणे आपल्या किरणांनी इतरांच्या जीवनात प्रकाश उधळीत असतो त्याचप्रमाणे आदर्श शिक्षकांच्या व्यक्तिमत्वातील सद्गुणांची किरणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाशझोत टाकत असतात. त्या प्रकाशझोताने तो विद्यार्थी देखील प्रकाशित होतो. त्यांच्या अंतर्मनातील अविवेकाची कोळिष्टके नष्ट होण्यास हा प्रकाश कारणीभूत

ठरलेला असतो. म्हणून अध्यापकाचे चारित्र्य हे निष्कलंक असणे गरजेचे असते. अध्यापकाच्या चारित्र्यावरील यत्किंचितही डाग विद्यार्थ्यांच्या मनातून अध्यापकाबद्दलची आपुलकी, आस्था, कमी करण्यास कारणीभूत ठरू शकतो.

' बोले तैसा चाले
त्याची वंदावी पाउले.'[5]

असे संतांनी म्हटले आहे. चारित्र्य माणसाचा आचरण हा मुख्य भाग असतो. म्हणून अध्यापकाचे आचरण हे सुशील, सुवर्तनी असणे गरजेचे असते. व्यक्तीचे चारित्र्य जन्माजात पक्के नसते. व्यक्ती ही अनेक सत्प्रवृत्तींचा कंद असते. या सत्प्रवृत्तींचे उदात्तीकरण करून चारित्र्यनिर्मिती साधावयाची असते. सामान्यतः ' श्रीमंत व्हावे ' असे वाटणे ही सत्प्रवृत्ती पण ती प्रत्यक्षात आचरणात आणली तर अविवेकाचे लक्षण ठरते. आणि म्हणूनच दुर्वर्तन म्हणून देणाऱ्या माणसाचे कुटुंबाचे वाटोळे होऊ शकते. मनातील अविचारी सत्प्रवृत्तींचा निचरा करून त्यांचे उदात्तीकरण केल्याचे आपण ' क्रीडा ' पाहतो. मानवी चारित्र्य निकोप राखण्यासाठी अशा ' क्रीडांची ' निर्मिती झाल्याचे आपणास पाहावयास मिळते.

दुसरे असे की, ' चारित्र्य या कल्पनेमध्ये ' नैतिकतेला ' अधिक महत्त्व दिले गेले आहे. ही नैतिकता व्यक्तीच्या आचरणातून ज्याचेजो प्रत्ययाला येत असते त्याचेही तो माणूस चारित्र्य संपन्न आहे असे आपण म्हणतो. परंतु ही चारित्र्यनिर्मिती घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. सद्गुणांचे व्यक्तिमत्त्वामध्ये रोपण करून केवळ भागत नाही, तर त्या सद्गुणांनी युक्त असावी अशी आकांक्षा जागवाव्या लागतात ही सद्गुणांनीयुक्त स्वयं ज्याचेजो व्यक्तिमत्त्वाचा स्वीकार करते त्याचवेळी खऱ्या अर्थाने ते सद्गुण त्या व्यक्तिमत्त्वाच्या चारित्र्याचा घटक बनून जाती.

ही प्रक्रिया लक्षात घेतली, आणि अध्यापकाच्या चारित्र्याचा मुलांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडतो हे (५० टक्के) अध्यापकांचे म्हणणे मान्य केले, तर अध्यापकाचे स्वतःचे चारित्र्य दैनंदिन हे त्याच्या आयुष्यातील अविधाराप्त ठरते. त्याने ते सातत्याने स्वीकारले पाहिजे असे कुणालाही वाटते.

सारणीतील अनुक्रमांक २,३,४ या स्तंभातील विवेचन सारणी क्र. ५.९ मधील अनुक्रमांक २, ३ च्या स्तंभात पृष्ठ क्र.           वर आलेले आहे. पुनरुक्तीचा दोष टाळण्यासाठी ते पुन्हा दिलेले नाही.

सारणीतील अनुक्रमांक ५ – अध्यापकांतील विद्यार्थ्यांची श्रद्धा, ६ – अध्यापकाचे विद्यार्थ्यांशी असलेले संबंध, ७ – अध्यापकांचे प्रसन्न व उत्साही व्यक्तीमत्व या तीन गोष्टींना कमीत कमी अध्यापकांनी (अनुक्रमे ८ टक्के, ४ टक्के, २ टक्के) प्रतिसाद दिला असला तरी मूल्यमापन करीत असताना विद्यार्थ्यांच्या मनावर अनुक्रमांक ५, ६, ७ मधील घटकांचा तीव्र प्रभाव पडत असतो हे विसरून चालणार नाही.

अध्यापकांवरील विद्यार्थ्यांची श्रद्धा ही श्रेष्ठ दर्जाची असते. आपण घरामध्ये असा प्रसंग पाहतो की, अध्यापकाने सांगितलेली गोष्ट चुकीची आहे असे पालक सांगू लागले तर पाल्य अध्यापकांची बाजू घेतो. आमचे अध्यापक जे सांगतात ते खरे असते अशी श्रद्धा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असते. यदाकदाचित अध्यापकांने विद्यार्थ्यांना चुकीचे मार्गदर्शन केले तर केवळ श्रद्धेपोटी विद्यार्थी मार्गदर्शनानुसार वागतो. या मार्गदर्शनातून तो विद्यार्थी चुकीच्या मार्गाला जाण्याची शक्यता असते. म्हणून श्रद्धा असणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण काय सांगावे, काय सांगावे नाही याचा अध्यापकांनी सावधानतेने विचार केला पाहिजे. 'वसंत कानेटकरांच्या' 'अश्रूंची झाली फुले' या नाटकातील 'लाल्या' अध्यापकांवरील श्रद्धेने घडला आहे. असे अनेक विद्यार्थी

अध्यापकांवर श्रध्दा ठेवून जीवन कंठावित. हे लक्षात ठेवले पाहिजे.

अध्यापकांचे विद्यार्थ्यांशी असलेले संबंध नैतिक मूल्यसंक्रमणाच्या बाबतीत महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. अध्यापकाने विद्यार्थ्यांशी ठेवलेले आपुलकीचे संबंध त्यांच्या अंतर्मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण करतात. ' काम करी आपण बरी ' असे म्हणून वर्तन करणाऱ्या अध्यापकांकडे कुठलेही विद्यार्थी ढुंकूनही फिरकत नाहीत. पण माया, प्रेमळ आणि आपण विद्यार्थ्यांचे श्रेष्ठ बंधू आहोत, त्यांच्या सुखदु:खाशी आपण विचार केला पाहिजे, त्यांच्या अडीअडचणी पाहिल्या पाहिजेत असे समजून वर्तन करणारा अध्यापक विद्यार्थ्यांचे श्रध्दास्थान बनत असतो. कबीरासारख्या संतश्रेष्ठांना म्हणूनच परमेश्वरापेक्षा गुरु श्रेष्ठ वाटतो. ते म्हणतात -

" गुरु गोविंद दोऊ खडे
काके लागू पाय ।
बलिहारी गुरु आपने
गोविंद दियो बताय ।।"[६]

अध्यापकाचे प्रसन्न व उत्साही व्यक्तीमत्वही मूल्यसंक्रमणाच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावत असते. अध्यापक हाही एक व्यक्ती असतो. त्यालाही काही व्यक्तिगत प्रश्न असतात. जीवनात निराशेने ग्रासले असे कोणतेस प्रसंगही त्यांच्या जीवनामध्ये आलेले असतात. हा व्यक्तिगत सुखदु:खाची किंवा आशा निराशेची प्रतिक्रिया अध्यापकाच्या वर्तनातून प्रकट होण्याची शक्यता असते. निरुत्साही चिंताग्रस्त अध्यापक विद्यार्थ्यांच्या कोमल मनावर विरजण टाकत असतात. वर्गामध्ये अध्यापकाने प्रवेश करताना आपल्या सर्व चिंतना विसरणे हे त्याचे म्हणूनच कर्तव्य ठरते. जीवन व्यवहारामध्ये आलेली समस्या ही एका अध्यापकाची असते. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन आणि आपल्या अध्यापनावर अध्यापकाने होऊ देऊ नये.

दुसरे असे की, अध्यापकांमध्ये काही स्वभाव दोष असण्याचीही शक्यता असते. या स्वभावदोषांमुळेसुद्धा अध्यापक वर्गामध्ये प्रसन्न आणि उत्साही व्यक्तिमत्व ठेऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थी वर्गामध्ये तुरुंगात ठेवलेल्या कैद्याप्रमाणे बंदिस्त होऊन जातात. अशा मूल्यांकनात आवश्यक त्या वातावरणाच्या अभावामुळे मूल्यांकन होणे कठीण जाते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११-अ - पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवित करीत असताना अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होतो काय ? - उत्तर नाही असल्यास कोणती कारणे असतात ? यासाठी अध्यापकांना चार कारणे देऊन प्रतिसाद मागितला होता. अध्यापकांचा प्रतिसाद खालील सारणीमध्ये नमूद केला आहे.

सारणी क्र. ५.३३

अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडत नसल्यास त्याची कारणे व त्यांचे वर्गीकरण
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनु. | कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी व अध्यापक यांचा सहवास कमीतकमी. | ५ | ५ |
| २. | पाठ ज्ञानात्मक पातळीवर अध्यापकांनी सदैव तसा विद्यार्थ्यांनी ठरविल्याने ते अध्यापकांच्या व्यक्तिमत्त्वाचा मूल्यांकनाच्या संदर्भात विचार करीत नाही. | ५ | ५ |
| ३. | पाठ्यपुस्तकातील मूल्ये व अध्यापकांचे व्यक्तित्व यांचा काही संबंध नाही. | ५ | ४ |
| ४. | मराठी अध्यापक व पाठातील मूल्ये यांचा अर्थाअर्थी संबंध नसतो याची जाण विद्यार्थ्यांना नाही. | ५ | २ |

सारणीतील १, २, ३, ४ यांना अनुक्रमे ५ टक्के, ५ टक्के, ४ टक्के, २ ट
२ टक्के इतका अत्यल्प प्रतिसाद अध्यापकांनी नोंदविलेला असल्याने कोणत्याही कारणांनी अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत नाही असे म्हणता येत नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न ११.क – पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये अंकित करीत असताना अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होतो काय ? उत्तर नाही असल्यास प्रश्नावलीत दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य कारणे कोणती ? हा मुक्त स्वरूपाचा होता. अध्यापकांनी नोंदविलेली कारणे त्यांच्या प्रतिसादांनुसार खालील सारणीमध्ये नोंदविलेली आहेत.

<u>सारणी क्र. ५.३०</u>

अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम न होण्याची
<u>अन्य कारणे व त्यांचे वर्गीकरण</u>

प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार

| अनु. | कारणे | प्रतिसाद | एकूण अध्यापक | प्रतिसाद टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | परीक्षा अभ्यासक्रम संपविण्याची टांगती तलवार | १ | ९५ | २ |
| २. | मूल्यांच्या टप्पी असे समाजात पडणारे प्रश्न | १ | ९५ | १ |
| ३. | केवळ गुणवत्ता यादीचाच होत असलेली उठी उठी. | १ | ९५ | १ |

सारणीतील अनुक्रमांक १, २, ३ यांना अध्यापकांकडून मिळालेला प्रतिसाद हा अनुक्रमे २ टक्के, १ टक्का, १ टक्का असा अल्पसा आहे. यावरून असे अनुमान काढता येते की अनुक्रमांक १, २, ३ ही कारणे अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विद्यार्थ्यांवर परिणाम न होण्याची कारणे होऊ शकत नाहीत. असे बहुसंख्य अध्यापकांना वाटते, याचा अर्थ अध्यापकाचे व्यक्तिमत्त्व मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात महत्त्वाचे असून सारणी क्र. ५.१७ मध्ये नोंद झाल्याप्रमाणे अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात होतो हे ९५ टक्के अध्यापकांचे म्हणणे मान्य करावे लागते. (पाहा सारणी क्र. ५.१७).

### ५.८ मूल्ये आणि सामाजिक वास्तव यांचा संबंध :

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमित करीत असताना सामाजिक वास्तव, सामाजिक वातावरण यांचा काही परिणाम होतो काय हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्र. १२, १२.अ, १२.ब, १२.क यांची योजना केली होती. अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण आणि विश्लेषण खाली प्रत्येक प्रश्नानुसार केले आहे.

प्रश्न क्रमांक १२ - ‘ पाठ्यपुस्तकातील मूल्ये संक्रमित करीत असताना सामाजिक वास्तव आड येते का ? ’ हा होता. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. प्रश्नासाठी दिलेल्या होय–नाही पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगितले होते. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील सारणी क्र. ५.२१ मध्ये दिलेला आहे.

**सारणी क्र. ५.२१**

मूल्यसंक्रमणात सामाजिक वास्तव आड येते का या संदर्भातील अध्यापकांचे मत

| अ.क्र. | होय-नाही | प्रतिसाद देणारे अध्यापक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | होय | ७१ | ७५ |
| २) | नाही | २४ | २५ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणीवरून असे आढळून येते की पाठ्यपुस्तकातील मूल्ये संक्रमित करीत असताना सामाजिक वास्तव आड येते असे ९५ अध्यापकांपैकी ७१ अध्यापकांचे (७५ टक्के) म्हणणे आहे. तर, सामाजिक वास्तव आड येत नाही असे २४ अध्यापकांना (२५ टक्के) वाटते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, अध्यापकांच्या बऱ्याच मोठ्या प्रमाणात (७५ टक्के) मूल्य संक्रमित करीत असताना सामाजिक वास्तव आड येते असे वाटते. मूल्य संक्रमण करीत असताना सामाजिक वास्तव आड येत नाही असे २५ टक्के अध्यापकांना वाटते. या अध्यापकांनी नोंदविलेला प्रतिसाद एकूण प्रतिसादाच्या ०.२५ असल्याने तो कमीतकमी आहे. म्हणून विचारात घेण्याचे कारण नाही. सामाजिक वास्तव मूल्य संक्रमण करीत असताना कशाप्रकारे आड येते याचा अधिक विवेचन सारणी क्रमांक ५.११ मधील अनुक्रमांक १ च्या संदर्भात पृष्ठ क्र. १११,११२,११३ वर केलेले आहे. द्विरुक्ती टाळण्यासाठी ते येथे दिले नाही.

प्रश्न क्र. १०.ब – " पाठ्यपुस्तकातील मूल्ये रुजवित असताना सामाजिक वास्तव आड येते का ? उत्तर होय असल्यास सामाजिक वास्तव मूल्यरुजवणुकीच्या कृतीत कशाप्रकारे आड येते ? " हा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. ९५ पैकी ७१ अध्यापकांनी (७५ टक्के) विविध कारणांची नोंद केलेली आहे. साधर्म्य तत्वाचा विचार करुन सारख्या आशयाची कारणे एका विधानात समाविष्ट केलेली आहेत. अशा विधानांचे वर्गीकरण अध्यापकांच्या प्रतिसादाच्या वारंवारितेसह खालील सारणी क्र. ५.२२ मध्ये नोंदविले आहे.

**सारणी क्र. ५.३२**

**मूल्यरुजवणुकीत सामाजिक वास्तव आड येण्याची कारणे**

प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार

| अनु. | कारणांची विधाने | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सामाजिक परिसर व वातावरण | ४८ | ६८ |
| २. | सामाजिक विषमता | ९ | १३ |
| ३. | पालकांचा निष्काळजीपणा | ३ | ४ |
| ४. | प्रसार माध्यमांचा चुकीचा वापर | ३ | ४ |
| ५. | विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाची मर्यादितता | ३ | ४ |
| ६. | कायद्यातील त्रुटी | १ | १ |
| ७. | समाजाच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन | १ | १ |
| ८. | विद्यार्थी शक्तीचा अयोग्य वापर | १ | १ |

वरील सारणी क्र. ५.२२ मध्ये मूल्यमापनाच्या कार्यात सामाजिक वास्तव आड येण्याची आठ कारणे नोंदविली आहेत. ही सर्व कारणे सामाजिक वास्तवाची अंगोपांगे आहेत याची जाण अध्यासकाला आहे. परंतु प्रत्येक कारणाच्या अर्थाच्या दृष्टीने नोंद होण्यासाठी म्हणून ती स्वतंत्रपणे नोंदविलेली आहेत. सारणीतील अनुक्रमांक १ – ' सामाजिक परिसर व वातावरण ' हे मूल्यमापनामध्ये आड येते असे ७१ अध्यापकांपैकी (७१ टक्के) ४८ अध्यापकांचे (५८ टक्के) म्हणणे आहे. याचा अर्थ बहुसंख्य अध्यापकांच्या मते सामाजिक वातावरण व परिसर हा मूल्यमापन करीत असताना अडसर बनतो. अनुक्रमांक २ ते ८ या विधानांना १२ टक्के च्या खाली प्रतिसाद मिळाला असला तरी सामाजिक वास्तवाचेच घटक म्हणून ते विधाने नोंद झाल्याने एकूण सामाजिक वातावरण परिसर, यांचा मूल्यमापन करीत असताना बऱ्याच मोठ्या प्रमाणात परिणाम होतो असे बहुसंख्य अध्यापकांना वाटते असे म्हणता येते.

सारणीतील अनुक्रमांक १, २, ३, ७ या संदर्भातील विवेचन सारणी क्र. ५.११ मधील अनुक्रमांक १ च्या संदर्भात पृष्ठ क्रमांक १११,११२,११३ वर केलेले आहे. तसेच अनुक्रमांक ४ च्या संदर्भातील विवेचनही सारणी क्र. ५.११ मधील अनुक्रमांक ४ च्या संदर्भात पृष्ठ क्रमांक ११४ वर केले आहे. तसेच अनुक्रमांक ४ च्या संदर्भातील विस्ताराचा दोष टाळण्यासाठी ते येथे दिलेले नाही.

' विद्यार्थ्याच्या अनुभव विश्वाची मर्यादितता ' हा एक सामाजिक वास्तवाचा घटक ३ अध्यापकांनी (४ टक्के) मानलेला आहे व तो मूल्यमापनाच्या संदर्भात आड येतो असे म्हटले आहे. विद्यार्थ्यांचे अनुभव-विश्व हे त्याचा वयोगट लक्षात घेता मर्यादित राहणार हे सत्य आहे. त्याच्या वयोमानानुसार त्याचे अनुभवविश्व विस्तारत जाते, पण मूल्यमापन करीत

असताना विद्यार्थ्यांना मूल्यसंवर्धनाच्या दृष्टीने सामाजिक परिसर, वास्तवा-मध्ये येणाऱ्या अडचणींची नोंद त्यांच्याकडून करून दिली पाहिजे. केवळ मूल्यसंक्रमण करीत राहिले आणि वास्तवामध्ये विशिष्ट मूल्यांच्या आडवी विरोधी परिस्थिती निर्माण झालेली असली, तर पुढील शाळेतील मूल्यसंक्रमणावरचा विश्वास उडण्याची शक्यता असते. म्हणून समाजातील दैनंदिन घटनांची नोंद घेत घेत विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंवर्धनाची जाणीव जागृत करीत राहिल्यास त्याचे अनुकूल चित्र मर्यादित जरी असले तरी मूल्यांसाठी ती सामाजिक वास्तवात आपणास उभा राहील असा विश्वास वाटतो.

कायद्यातील त्रुटी (सारणी क्र. ५.२२ क्र. ६) हे एक सामाजिक वास्तव मानून मूल्यसंक्रमणात अडसर निर्माण करते असे एका अध्यापकाने १८ टक्का म्हटलेले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी त्यानेच नोंद केलेले उदाहरण येथे नोंदविले आहे. त्याच्या मते, ` संकटकाळात इतरांना मदत करावी असे आपण सांगतो. परंतु अपघातग्रस्ताच्यावेळी मदत केल्यास मदत करणाऱ्याच्याच पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लागतो हे या अध्यापकाचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून असले तरी मान्य होण्यासारखे नाही. ज्याच्यामध्ये पूर्णांशाने मूल्य कृपित झाले आहे असा मनुष्य ` कशाला पोलिसांची कटकट मागे ` म्हणून अपघातातील व्यक्तीला तसेच सोडून जाईल असे वाटत नाही. तसेच ` जिथे कायदा आला, तिथे शोध आला तिथे तेढ हा आगारच, ही काही कायद्यातील त्रुटी होत नाही. परंतु अध्यापकाला ती त्रुटी वाटते हे चूक आहे. खरे म्हणजे अशावेळी जे आपण अपघातातील व्यक्तीकडे दुर्लक्ष करतो हे कायद्यातील त्रुटी दाखविण्यासाठी नसून आपण स्वतःच त्याने ग्रासलेले असतो. पोलिसांचा ससेमिरा पाठी लागेल, कोर्ट कचेऱ्या कराव्या लागतील याबाबतची वाटणारी कायद्यातील त्रुटी सिद्ध करीत नाहीत तर व्यक्तीचे कातडी बचाऊ धोरण सिद्ध करतात.

वरील गोष्टीचे अधिक स्पष्टीकरण करण्यास महात्मा गांधीजींच्या जीवनातील एक आख्यायिका सांगितली जाते ती येथे देत आहे -

महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसा तत्त्वाबद्दल गांधीजींना निरुत्तर करण्यासाठी कोणी एक प्रश्न केला होता. ' चौकात एक व्यक्ती उभी असताना एक गाय धावत धावत आली आणि समोरून निघून गेली. थोड्याच वेळात पाठीमागून एक कसाई धावत आला. त्याने विचारले, ' गाय कुठे गेली ? ' चौकातील व्यक्तीला आपल्या समोरील माणूस हा कसाई आहे हे माहित आहे, आणि गाय कुठे गेली हेही माहित आहे. पण जर सत्य सांगावे तर हिंसा घडणार आणि खोटे बोलावे तर असत्य कथनाचे पाप लागणार. अशा परिस्थितीत चौकातील व्यक्तीने सत्य आणि अहिंसा व्रत कसे पाळावे. ? '

या त्यांच्या प्रश्नावर गांधीजींनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक आहे. त्यांनी सांगितले -

' चौकातील व्यक्ती कसायाला असे सांगू शकली असती, ' गाय कुठे गेली ते मला ठाऊक आहे, पण मी ते तुला सांगणार नाही. ' यामध्ये सत्य आणि अहिंसेचे आपोआपच पालन होते. पण गाय कुठे गेली हे माहित असूनही व्यक्ती आपल्याला सांगत नाही म्हणून कसाई रागावेल व त्याचा राग आपल्यावर निघेल म्हणून चौकातील व्यक्ती सत्य अहिंसा तत्त्वातील त्रुटींचा निर्देश करत असते. अशा त्रुटी कधी नसतात.

मूल्यशिक्षित झालेला माणूस हा प्रथम निर्भय असतो. समाजातील त्रुटींची नोंद करणाऱ्या अध्यापकाच्या मताबद्दलही आपल्याला हेच म्हणता येईल.

विद्यार्थी संमतीचा अयोग्य वापर (सारणी क्र. ५.२२, क्र.८) हा मूल्यशिक्षणात अडसर निर्माण करतो असे एका अध्यापकाने (१ टक्का) म्हटले आहे. स्वाय परिस्थितीचे निरीक्षण केले असता हे आपल्याला काही वेळी मान्य करावे लागते. बातम्यांना अनुसरून उभ्या राहिलेल्या संघटना, पुढाऱ्यांचे अनुयायि व स्वीकारल्याने मिळणारे तात्कालिक भौतिक सुख यामुळे कुमार आणि युवा गटातील विद्यार्थी झुकण् म्हटलेल्या वातावरणात दिशाहीन झालेले पहावयास मिळतो. त्यामुळे अशा दिशाहीन विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षण करणे हे कठीण कार्य होऊन बसते. यासाठी संपूर्ण जनजागरण होणे गरजेचे आहे असे सुचवावेसे वाटते.

प्रश्न क्रमांक १२.ब – पाठ्यपुस्तकातील मूल्ये केंद्रित करीत असताना सामाजिक वास्तव आड येते का ? उत्तर नाही असल्यास प्रश्नावलीत दिलेल्या तीन कारणांपैकी कोणती कारणे संभवतात ? हा उपप्रश्न स्वरूपाचा होता. अध्यापकांनी तीन कारणांना दिलेले प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केलेले आहे.

<u>सारणी क्र. ५.३३</u>

<u>मूल्यशिक्षणात सामाजिक वास्तव आड न येण्याची कारणे</u>
प्रतिसादांच्या उत्तरांच्या श्रेणीनुसार

| अनु. | कारणे | प्रतिसाद | एकूण अध्यापक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | शालेय वातावरण व सामाजिक वास्तव यांचा संबंध नाही. | ८ | ९५ | ८ |
| २) | सामाजिक वास्तवातून आलेल्या विद्यार्थ्यांना आपण घडवायचे आहे याची जाण अध्यापकांना नाही. | ७ | ९५ | ७ |
| ३) | शाळा ही आपल्या समाजाची प्रतिकृती आहे याकडे कुणाचे लक्ष नाही. | ११ | ९५ | ११ |

वरील सारणी क्र. ५.२३ मध्ये मूल्यसंक्रमणात सामाजिक वास्तव आड न येण्याची जी तीन कारणे दिलेली आहेत त्यांना अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद हा अनुक्रमे ८ टक्के, ७ टक्के, ११ टक्के असा आहे. हा प्रतिसाद १० टक्के च्या आसपास असल्याने तो अत्यल्प आहे म्हणून विचारात घेण्याचे कारण नाही. यावरून असा अन्वयार्थ काढता येतो की, मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीत बऱ्याच मोठ्या प्रमाणात सामाजिक वास्तव आड येते.

प्रश्न क्र. १२.क – पाठ्यपुस्तकातील मूल्ये संक्रमित करीत असताना सामाजिक वास्तव आड येते का ? उत्तर नाही असल्यास कोणती अन्य कारणे संभवतात हा मुक्त प्रश्न होता. अध्यापकांनी नोंदविलेल्या कारणांचे साधर्म्य तत्वाच्या आधारे वर्गीकरण करून खालील सारणीमध्ये अध्यापकांच्या प्रतिसादांच्या वारंवारितेसह नमूद केले आहेत.

<u>सारणी क्र. ५.२४</u>

मूल्यसंक्रमणात सामाजिक वास्तव आड न येण्यामागील अन्य कारणे

प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार

| अनु. | कारणे | प्रतिसाद | एकूण अध्यापक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | परीक्षेसाठी अभ्यास स्वतंत्र विचार. | २ | ९५ | २ |
| २. | ' फसवणे ' हे शाळे कायदेशीर मानले पुढेना. | २ | | २ |
| ३. | मूल्यसंक्रमणासाठी आग्रह नाही. | १ | | १ |
| ४. | पालकांचे अयोग्य वर्तन | १ | | १ |
| ५. | लोकसंख्येच्या मानाने शिक्षण प्रसार नाही. | १ | | १ |
| ६. | विद्यार्थ्यांच्या अनुभवाची मर्यादा. | १ | | १ |
| ७. | सामाजिक वास्तव व मूल्यांची सांगड शाळेमध्ये करून दिली जाते. | १ | | १ |

वरील सारणी क्र. ५.२४ मध्ये मूल्यसंक्रमणात सामाजिक वास्तव आड न येण्याची जी सात कारणे नोंदवलेली आहेत त्यांना अध्यापकांनी केवळ १ ते २ टक्के असा मामुली प्रतिसाद नोंदवलेला आहे. याचाच अर्थ सामाजिक वास्तव मूल्यसंक्रमणात निश्चितरीत्या परिणाम करते असे म्हणता येते. म्हणून ७५ टक्के अध्यापकांना सामाजिक वास्तव मूल्यसंक्रमणाच्या आड येते. (पाहा सारणी क्र. ५.२१) हे ७५ टक्के अध्यापकांचे म्हणणे मान्य होण्यास काहीच हरकत नसावी.

५.७ मूल्य आणि अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर
कार्यक्रमांचे आयोजन :

पाठांमधून प्रतिबिंबित होणारी ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी अध्यापक अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रम आयोजतात काय ? त्यांचे स्वरूप काय ? कोणकोणते कार्यक्रम आयोजतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १३, १३.अ, १३.ब यांची योजना केलेली होती. अध्यापकांनी प्रश्नांना दिलेल्या प्रतिसाद वर्गीकरण आणि विश्लेषण प्रश्नानुसार खाली केले आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १३ - पाठ्यपुस्तकातील मूल्ये संक्रमित होण्याच्या दृष्टीने काही अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन करता का ? हा होता. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. प्रश्नासाठी दिलेल्या दोन-हांपैकी पर्यायापैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केला आहे.

**सारणी क्र. ५.२५**

**मूल्यमापनासाठी अभ्यासपूरक उपक्रमांच्या आयोजना-बाबतीतील अध्यापकांचे मत**

| अनु. | होय-नाही | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ८० | ८४ |
| २. | नाही | १५ | १६ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणीवरून असे आढळून येते की, ९५ अध्यापकांपैकी ८० अध्यापकांच्या (८४ टक्के) मते मूल्यमापित करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन त्यांच्याकडून केले जाते व १५ अध्यापकांनी (१६ टक्के) असे आयोजन आपल्याकडून केले जात नाही असे मत नोंदविलेले आहे. १६ टक्के हे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणून ते विचारात घेण्याचे कारण वाटत नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बहुसंख्य अध्यापक मूल्यमापन करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन करतात.

प्रश्न क्र. १२.ब - मध्ये अध्यापक अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन करत असल्यास योजत असलेल्या उपक्रमांची व त्यातून विकसित होणाऱ्या मूल्यांची उपक्रमांसमोर नोंद करावयास सांगितली होती. अध्यापकांनी केलेली उपक्रमांची मूल्यांसह नोंद त्यांच्या प्रतिसादाच्या वारंवारितेसह सारणी क्रमांक ५.२६ मध्ये नोंदविलेली आहे.

## सारणी क्र. ५.२६

**मूल्यानुसार अध्यापनपूरक उपक्रमांचे आयोजन व त्यांचे वर्गीकरण**

(प्रतिसादांच्या उतरत्या क्रमानुसार)

| अनु. | योजित असलेले उपक्रम | प्रतिबिंबित मूल्ये | अध्यापक प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार (शूर, हुशार, प्रामाणिक, कष्टाळू, खेळाडू) | सद्गुणवृध्दी | ३३ |
| २. | विविध स्पर्धा (लेखन, वाचन, वक्तृत्व, खेळ इत्यादी) | चिकाटी, प्रतिष्ठा, कलागुणविकास | १९ |
| ३. | विविध गुणदर्शन उपक्रम (सांस्कृतिक कार्यक्रम, भिंती पत्रिका, [illegible] इत्यादी) | रसिकता, सौंदर्याभिरुची, सर्जनशीलता, निर्भीडपणा, देशप्रेम | १४ |
| ४. | समाजसेवा उपक्रम (अंधश्रध्दा निर्मूलन, स्वच्छता मोहीम, आरोग्य शिबीरे इ.) | स्वावलंबन, सहकार्य, त्याग, लोकसंग्रह, श्रमप्रतिष्ठा | १३ |
| ५. | सहल (निसर्गभ्रमंती, प्राणी संग्रहालय भेट, विज्ञान संस्थांना भेटी इ.) | समता, निसर्गप्रेम, बंधुभाव, भूतदया, वैज्ञानिक दृष्टी | १० |
| ६. | गरीब, आजारी मुलांना मदत | दयाबुध्दी, परोपकार, बंधुभाव, मानवता | ६ |
| ७. | राष्ट्रीय सण (स्वातंत्र्य दिन, श्रेष्ठ पुरुषांची जयंती, स्मृती दिन) | देशप्रेम, त्याग, [illegible] | ८ |

सारणी क्र. ५.२६ (पुढे चालू...)

| अनु. | योजना असलेले उपक्रम | प्रतिबिंबित मूल्ये | प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ८. | आर्थिक बाबनांवर चर्चा | विवेकनिष्ठा, चिकित्साशीलता, परमतादर | ६ |
| ९. | आपापल्यातील्यांना मदत | सहानुभूती, बंधुभाव | ६ |
| १०. | वृक्षारोपण | वृक्षसंवर्धन, पर्यावरण जाण | ५ |
| ११. | सहभोजन, सहनिवास | बंधुभाव, समानता | ४ |
| १२. | विज्ञान प्रदर्शन भरविणे व सहभाग | शास्त्रीय दृष्टीकोन, सर्जनशीलता | ३ |
| १३. | व्याख्यानांचे आयोजन | वाङ्मयीन जागृती, चिकित्साशीलता, परमतादर | ३ |
| १४. | आदर्श विद्यार्थी पारितोषिक | गुणग्राहकता | २ |
| १५. | सुवचनांचा संग्रह | संग्रहवृत्ती, ग्रहणशीलता, उपक्रमशीलता | २ |
| १६. | सांस्कृतिक, सामाजिक चित्रपट प्रदर्शन आयोजन | सामाजिक दृष्टी | २ |
| १७. | आजारी व्यक्तींची सेवा | सेवाभाव | १ |
| १८. | उपकरणांची निर्मिती | संशोधन वृत्ती, उपक्रमशीलता | १ |
| १९. | गणवेश सक्ती | समानता | १ |
| २०. | गुरुजनांचा सत्कार | गुरुआदर | १ |
| २१. | प्रश्नमंजुषा | जिज्ञासा, ज्ञानार्जन | १ |

सारणी क्र. ५.२६ (पुढे चालू...)

| अनु. | योजना केलेले उपक्रम | प्रतिबिंबित मूल्ये | प्रतिसाद |
|---|---|---|---|
| २२. | वर्ग सजावट | सौंदर्यदृष्टी, सहकार्य | १ |
| २३. | विविध वस्तु भांडार चालवणे | स्वावलंबन | १ |
| २४. | वर्गातील गुणवंतांचा सत्कार | गुणग्राहकता, आदर-भाव | १ |
| २५. | संस्कार वर्ग | संस्कारशीलता | १ |
| २६. | संचयिका | काटकसर | १ |

वरील सारणी क्र. ५. २६ मध्ये अध्यापकांनी एकूण २६ अभ्यासपूरक उपक्रमांची नोंद केलेली आहे व त्या त्या उपक्रमांद्वारे त्यातून संक्रमित होणाऱ्या मूल्यांची यादी दिलेली आहे. ज्या २६ अभ्यासपूरक उपक्रमांची अध्यापकांनी नोंद केलेली आहे त्यांचे आयोजन केले असता सर्वसाधारणतः प्रत्येक उपक्रम हा अभ्यासेतर असल्याचे आपणास दिसते. परंतु पाठ्यपुस्तकांमधून जी मूल्ये संक्रमित करावयाची आहेत त्यांना उपयुक्त असे हे कार्यक्रम अध्यापकांनी गृहित धरले असल्याने ते अभ्यासपूरक आहेत असे म्हणता येते.

२६ उपक्रमांना अध्यापकांनी वेगवेगळ्या प्रमाणात प्रतिसाद दिला असला तरी, सर्व उपक्रम मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत हे कोणीही मान्य करेल.

यातील काही उपक्रम सर्व शाळांनी करण्यासारखे आहेत. त्यांचे आयोजन सर्व शाळांमधून केले जावे असे सुचवावेसे वाटते.

प्रश्न क्र. १३.ब मध्ये संक्रमित करण्यासाठी अभ्यासपूरक उपक्रमांशिवाय अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन अध्यापकांकडून केले जात असल्यास त्याची नोंद करण्यास सांगितली होती. अध्यापकांनी अभ्यासेतर म्हणून नोंदलेले उपक्रम व त्यातून संक्रमित होणारी मूल्ये पुढील सारणी क्र. ५.२७ मध्ये अध्यापकांच्या प्रतिसादासह नोंदली आहेत.

<u>सारणी क्र. ५.२७</u>

<u>मूल्यसंक्रमणासाठी अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन व त्यांचे वर्गीकरण</u>

प्रतिसादाच्या उतरत्या क्रमानुसार

| अ.क्र. | अभ्यासेतर उपक्रम | संक्रमित होणारी मूल्ये | प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | विविध स्पर्धा (लेखन, वाचन, रांगोळी, समूहगीत, व्याख्यान, खेळ) | चिकाटी, श्रमप्रतिष्ठा, कलागुणविकास | ८ |
| २. | वक्त्यांची भाषणे | ज्ञानवृद्धी, परमतादर, चिंतनशीलता, विनय आचरण | ७ |
| ३. | विविध गुणदर्शन | कलागुणविकास, सर्जनशीलता | ६ |
| ४. | सहली | नम्रता, निसर्ग प्रेम, लोककार्यप्रवृत्ती, विज्ञानदृष्टी, सहकार्याची जाणीव | ५ |
| ५. | विविध शिबीरे (अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडा विरोध, आरोग्य सेवा, सामाजिक अन्य प्रश्न) | समाजसेवा, विवेकनिष्ठा, लोकसंग्रह | ४ |
| ६. | शैक्षणिक चित्रपट | ज्ञानवृद्धी, तारतम्यभाव | ४ |
| ७. | आदर्श विद्यार्थी निवड | गुणग्राहकता, आदर्शाची जाण | २ |

सारणी क्र. ५.२७ (पुढे चालू...)

| अनु. | अभ्यासेत्तर उपक्रम | विकसित होणारी मूल्ये | प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ८. | आपद्ग्रस्तांना मदत | दयाबुद्धी, सहानुभूती, बंधुभाव | २ |
| ९. | गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार | गुणग्राहकता | २ |
| १०. | राष्ट्रीय सण | देशप्रेम | २ |
| ११. | वृक्षसंवर्धन | निसर्ग प्रेम | २ |
| १२. | सुभाषित पाठांतर | गुणग्राहकता, सद्वचनांचा आदर | २ |
| १३. | स्वच्छता मोहीम | स्वच्छता, आरोग्य | २ |
| १४. | अपंगांना मदत | सहानुभूती | १ |
| १५. | आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहार | बंधुभाव, आंतरराष्ट्रीय सामंजस्य | १ |
| १६. | एन.सी.सी. | राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा | १ |
| १७. | एन.एस.एस. | समाजसेवा | १ |
| १८. | नेत्रदान | दातृत्व | १ |
| १९. | परिसंवाद | विवेकनिष्ठा, परमतादर | १ |
| २०. | विद्यार्थी मित्र | स्वयं प्रकाशन | १ |
| २१. | संस्कारयुक्त पुस्तकांचे सामूहिक वाचन | संस्कार ग्रहण | १ |

वरील सारणी क्र. ५.२७ मध्ये अध्यापकांनी अभ्यासेत्तर म्हणून नोंदवलेले २१ उपक्रम आहेत. या २१ उपक्रमांना अध्यापकांनी कमी-जास्त

प्रतिसाद मिळाला असला तरी हे सर्व अभ्यासेत्तर उपक्रम मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात काहीना काही महत्त्वाची भूमिका बजावतात, हे कोणीही अमान्य करणार नाही. म्हणून माध्यमिक शाळांमधून राबविल्या कृतीनुसार वरील अभ्यासेत्तर उपक्रमांपैकी काहीचे का होईना सातत्याने आयोजन होणे गरजेचे आहे असे म्हणावेसे वाटते.

## ५.८ पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे संख्या प्रमाण आणि त्यामुळे मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी :

पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होत असलेल्या मूल्यांचे प्रमाण किती ? हे प्रमाण योग्य की अयोग्य ? त्यामुळे मूल्य संक्रमणामध्ये काही अडचणी येतात का ? या संदर्भात शोध घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १४, १४.अ, १५, १५.अ, १५.ब ची योजना केली होती. अध्यापकांनी या प्रश्नांना मिळाला प्रतिसाद प्रश्नानुसार वर्गीकरण व विश्लेषण करून खाली नमूद केला आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १४ – इयत्ता ९ वी १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या कुण मूल्यांची संख्या आपणास अधिक वाटते काय ? हा होता. हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. प्रश्नाला दिलेल्या होय–नाही पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगितले होते. अध्यापकांनी मिळाला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केला आहे.

## सारणी क्र. ५.२८

### पाठ्यपुस्तकातील मूल्यांच्या संख्या प्रमाणाबाबत अध्यापकांचे मत

| अनु. | मूल्य संख्या अधिक वाटते काय | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३४ | ३६ |
| २. | नाही | ६१ | ६४ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी ५.२८ मध्ये असे दिसून येते की, ९५ अध्यापकांपैकी ३४ अध्यापकांनी (३६ टक्के) पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्यसंख्या अधिक वाटते आहे असा प्रतिसाद नोंदवला आहे, तर ही मूल्य संख्या अधिक वाटत नाही असा प्रतिसाद ९५ पैकी ६१ अध्यापकांनी (६४ टक्के) नोंदवलेला आहे. याचा अर्थ बहुसंख्य मोठ्या अध्यापकांच्या संख्येने पाठ्यपुस्तकातील मूल्यसंख्या अधिक नाही असे मत व्यक्त केले आहे. त्यासाठी त्यांनी काही स्पष्टीकरण प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २४ खालील मोकळ्या जागेत स्पष्टीकरण केले आहे, ते विचारात घेण्यासारखे आहे म्हणून येथे नोंदविले आहे.

एका अध्यापकाने आपले मत नोंदवत असताना असे म्हटले आहे, ‘ पाठ्यपुस्तकातील विषयाच्या विविधतेमुळे मूल्यांची संख्या अधिक असणे शक्य असले तरी मूल्यांची संख्या कमी की जास्त असे मूल्यांचे विश्लेषण करू नये. कारण एका मूल्यातून दुसरे मूल्य निर्माण होते. अनेक पाकळ्यांनी फूल बनते. फुलाचे अस्तित्व स्वतंत्र असले तरी अनेक पाकळ्यांच्या अस्तित्वातून फुलाच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त होतो. ‘ मूल्य ’ ही संकल्पना अशा-प्रकारची आहे.’

दुसऱ्या एका अध्यापकाने ' मूल्य संख्या पाच की पन्नास हा स्वारस्य नाही ' असे नमूद करून ' एका मूल्याच्या संक्रमणातून दुसरे मूल्य स्वाभाविकपणे संक्रमित होत असते. संख्येपेक्षा परिणाम महत्त्वाचा. ' असे मत नोंदविले आहे.

वरील दोन अध्यापकांचे म्हणणे मान्य होण्यास कोणतीच हरकत नसावी. अध्यापनाच्या, नियोजनाच्या सोयीसाठी मूल्यांतर्गत गोष्टी आपण संख्येमध्ये मोजत असलो, तरी व्यक्तिमत्त्वातून दिसणारा एकूण परिणाम मूल्यसंक्रमणाच्या संख्येपेक्षा महत्त्वाचा असतो हे मान्य करावे लागते.

म्हणून सारणी क्र. ५.२८ मध्ये नोंद झालेला ' मूल्यसंख्या अधिक वाटत नाही ' हा ८१ अध्यापकांचा (८४ टक्के) प्रतिसाद मान्य करावा लागतो.

प्रश्न १४.अ – " इयत्ता ९ वी, १० वीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या एकूण मूल्यांची संख्या आपणास अधिक वाटते का ? उत्तर ' होय ' असल्यास त्याची कारणे कोणती ? " हा होता. हा पुरक स्वरूपाचा प्रश्न होता. ९६ अध्यापकांपैकी २५ अध्यापकांनी (२६ टक्के) विविध कारणे नोंदविलेली आहेत. आशयाच्या तत्त्वाचा विचार करून समान आशयाची कारणे एका विधानामध्ये समाविष्ट केलेली आहेत. खालील सारणीमध्ये अध्यापकांच्या प्रतिसादाचे हे नोंदविलेली आहेत.

**सारणी क्र. ५.२९**

**पाठ्यपुस्तकातील मूल्य संख्या अधिक वाटण्याची कारणे**

**प्रतिसादाच्या उतरत्या क्रमानुसार**

| अनु. | कारणे | प्रतिसाद | एकूण अध्यापक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | पाठ अध्यापनास मिळणारा वेळ | ११ | ९५ | १२ |
| २. | मोजकीच मूल्ये चांगल्या प्रकारे रुजवता येतील. | ७ | ९५ | ७ |
| ३. | कोणत्या मूल्यावर भर व कोणाचे मूल्यमापन करावे या संबंधीत संभ्रम. | ३ | ९५ | ३ |
| ४. | विषयातील विविधता | २ | ९५ | २ |
| ५. | पाठसंख्या अधिक | १ | ९५ | १ |
| ६. | मुलांचा मानसिक गोंधळ निर्माण होतो. | १ | ९५ | १ |

वरील सारणी क्र. ५.२९ चे अवलोकन केले असता असे आढळून येते की, पाठ्यपुस्तकातील मूल्यसंख्या अधिक वाटण्याची सहा कारणे अध्यापकांनी नोंदविलेली आहेत. सहाही कारणांना अध्यापकांकडून मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता तो १२ टक्के पेक्षाही कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा प्रतिसाद अत्यल्प मानावयास हरकत नसावी. त्यामुळे सारणी क्र. ५.२९ मध्ये नमूद झालेल्या ६ कारणांवरून पाठ्यपुस्तकातील मूल्यसंख्या अधिक आहे असे बहुसंख्य अध्यापकांना वाटत नाही.

पाठ अध्यापनास मिळणारा वेळ – अनुक्रमांक १ चा विचार करता मूल्ये अधिक वाटतात असे ११ अध्यापकांनी (१२ टक्के) मत नोंदविले आहे.

पण त्यांचे हे मत मान्य होण्यासारखे नाही. कारण कोणतेही ' मूल्य ' हे स्वतंत्र कधीच नसते. एक मूल्य दुसऱ्याशी संबंधित असते. अध्यापनातील विशिष्ट घटना, विशिष्ट प्रसंग निर्मिती करून एखादे आणि मूल्यबोध विद्यार्थ्यांमध्ये रुजू शकतो. मूल्यांचा व्यक्तिमत्वातील घटकांशी एक अतूट संबंध आहे. म्हणून मूल्य संदर्भात भावनेला आवाहन करून विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त केले तर त्यांच्यामध्ये मूल्यसंक्रमण होऊ शकते. यासाठी अध्यापनात विशेष वेळ मूल्यशिक्षणाच्या नावाने कशाला हवा आहे हे कारण उचित वाटत नाही त्यामुळे ते मान्य करता येत नाही.

पाठ्यपुस्तकात भौतिकोत्तर मूल्ये असतील तर ती चांगल्या प्रकारे रुजवता येतील (सारणी क्र.५.२९ क्र.२) असे ७ टक्के अध्यापकांना वाटते. त्यांचे हे म्हणणेही पटणारे नाही. एक मूल्य दुसऱ्या मूल्यांशी निगडीत असते हे आपण मागे विश्लेषणाच्या वेळी पाहिलेले आहे. (पहा सारणी क्र. ५.२८ चे विश्लेषण पृष्ठ क्र. ,१६१,१६२)

सारणी क्र. ५.२९ मधील अनुक्रमांक ३ – कोणत्या मूल्यांवर भर व कोणाचे मूल्यमापन करावे या संदर्भात संभ्रम. आणि अनुक्रमांक ६ – मुलांचा मानसिक बौद्धिक विकास होतो. या कारणांच्या विश्लेषणासाठी सारणी क्र. ५.२८ चे (पृष्ठ क्र.१६१,१६२वरील) विश्लेषण पुरेसे वाटते.

विषयातील विविधता व पाठसंख्या अधिक (सारणी क्र. ५.२९ क्र. ४ व ५) ही कारणे मात्र मूल्य संख्या अधिक का या संदर्भात मान्य होण्यासारखी आहेत.

प्रश्न क्रमांक ३३ १५ – एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्यामुळे ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यामध्ये काही अडचणी येतात का ? हा होता. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. या प्रश्नाला दिलेल्या होय–नाही या पर्यायांपैकी लागू पडणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेले प्रतिसाद खालील सारणीमध्ये नमूद केलेले आहेत.

सारणी क्रमांक ५.३०

मूल्यसंख्या अधिक असले मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणीबाबत अध्यापकांचे मत

| अनु. | होय–नाही | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १५ | १६ |
| २. | नाही | ८० | ८४ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी क्र. ५.३० वरून असे आढळून येते की, ९५ पैकी १५ अध्यापकांना (१६ टक्के) मूल्यसंख्या अधिक असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये संक्रमित करताना काही अडचणी येतात असे वाटते तर ८० अध्यापकांना (८४ टक्के) तशा काही अडचणी येत नाहीत असे वाटते. सारणी क्र. ५.२८ मध्ये ६४ टक्के अध्यापकांनी मूल्य संख्या अधिक वाटत नाही असे मत नोंदविले होते. या मताशी वरील सारणी क्र. ५.३० मधील ८० अध्यापकांचे (८४ टक्के) म्हणणे विचारात घेता मान्य होण्यासारखे आहे. मूल्यसंख्या अधिक नाही असे बहुसंख्य अध्यापकांना वाटते त्यामुळेच बहुसंख्य अध्यापकांनी (८४ टक्के) मूल्यसंख्या अधिक असल्याने मूल्यसंक्रमणात अडचणी येत नाहीत असे मत नोंदविले आहे. त्यांचे हे मत संयुक्तिक वाटते.

प्रश्न क्र. १५.ब - एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्यामुळे ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यामध्ये काही अडचणी येतात का ? - उत्तर होय असल्यास कोणती कारणे संभवतात याबाबत अध्यापकांना तीन कारणे देऊन प्रतिसाद मागितला होता. अध्यापकांचा प्रतिसाद खालील सारणीमध्ये नमूद केला आहे.

<u>सारणी क्रमांक ५.३१</u>

मूल्यसंख्या अधिक असल्यामुळे मूल्यसंक्रमणात येणाऱ्या
<u>अडचणी मागील कारणे</u>
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनु. | मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी मागील कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्याने ती रुजविण्यास वेळ कमी पडतो. | १३ | १३ |
| २. | एका पाठामध्ये अधिक मूल्ये असल्यामुळे विशिष्ट मूल्यांकडे बारीकाईने लक्ष देता येत नाही. | १२ | १२ |
| ३. | एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्याने त्यांच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष होते | ६ | ६ |

एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्याने ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करीत असताना ज्या अडचणी येतात त्यामागील सारणीमध्ये दिलेल्या तीन कारणांना ९५ अध्यापकांपैकी केवळ २५ अध्यापकांनी (२६ टक्के) प्रतिसाद दिलेला आहे. सारणीमध्ये नोंद झालेल्या तीन कारणांना अनुक्रमे १३ टक्के, १२ टक्के, ६ टक्के प्रतिसाद मिळाला आहे.

सारणीतील अनुक्रमांक १ - एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्याने ती शिकविण्यास वेळ कमी पडतो, अनुक्रमांक २ - एका पाठामध्ये अधिक मूल्ये असल्यामुळे विशिष्ट मूल्यांकडे जातीने लक्ष देता येत नाही. अनुक्रमांक ३ - एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्याने त्यांच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होते. या मूल्य संक्रमणात येणाऱ्या अडचणींमागील कारणांना मिळालेला प्रतिसाद अल्पसा आहे. पाठ्यपुस्तकातील मूल्यसंख्या अधिक नाही असे ८४ टक्के अध्यापकांचे म्हणणे आहे (पाहा सारणी क्र. ५.२८) या म्हणण्यासाठी सारणी क्र. ५.३१ मध्ये नोंदविलेल्या विधानांचा अल्पसा प्रतिसाद नजरेतून पाहता ती संयुक्तिक वाटते.

प्रश्न क्र. ९५.८ - एकूण मूल्यांची संख्या अधिक असल्यामुळे ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यामध्ये काही अडचणी येतात का ? येत असल्यास प्रश्नावलीत दिलेल्या तीन कारणांव्यतिरिक्त अन्य कोणती कारणे संभवतात. हा होता. हा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. ९५ अध्यापकांपैकी १५ अध्यापकांनी (१६ टक्के) विविध कारणांची नोंद केलेली आहे. नोंदविलेल्या कारणांतून साधर्म्य तत्त्वाच्या आधारे समान आशयाचे प्रतिसाद एका विधानाखाली घेतले आहेत. खालील सारणीमध्ये अशी विधाने अध्यापकांच्या प्रतिसादासह नोंदविलेली आहेत.

## सारणी क्रमांक ५.३२

**मूल्य संख्या अधिक असल्याने मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणीमागील अन्य कारणे**

(प्रतिसादांच्या उत्तरांच्या श्रेणीनुसार)

| अनु. | अन्य कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी परीक्षार्थी बनलेला आहे. | ५ | ५ |
| २. | विविध उपक्रम आयोजण्यास वेळ अपुरी | ३ | ३ |
| ३. | वर्गातील विद्यार्थी संख्या | ३ | ३ |
| ४. | मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम नियोजन नाही. | २ | २ |
| ५. | विद्यार्थी शिक्षक सहवास कमी | १ | १ |
| ६. | मूल्यांचे मूल्यमापन | १ | १ |
| ७. | विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता | १ | १ |
| ८. | विद्यार्थ्यांचा सामाजिक स्तर भिन्नता | १ | १ |

पाठ्यपुस्तकातील मूल्य संख्या ६४ टक्के अध्यापकांना अधिक वाटत नाही. (पहा सारणी क्र. ५.२८) त्यामुळे मूल्यसंख्या अधिक असल्याने मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणीमागील सारणी क्र. ५.३२ मध्ये नोंदविलेल्या आठ कारणांना १ टक्का ते ५ टक्के पर्यन्त केवळ प्रतिसाद मिळालेला पहावयास मिळतो. अध्यापकांचा मूल्यसंख्येच्या उणीवातील एकूण दृष्टिकोन लक्षात घेता त्यांचा हा अत्यल्प प्रतिसाद संयुक्तिक वाटतो.

पुढे असे की, सारणी क्र. ५.३२ मध्ये नोंद झालेली कारणे अनुक्रमे १ - विद्यार्थी परीक्षार्थी बनलेला आहे. २ - विविध उपक्रम आयोजण्यास वेळ अपुरी, ३ - वर्गातील विद्यार्थी संख्या, ४ - मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम नियोजन नाही, ५ - विद्यार्थी शिक्षक सहवास कमी, ६ - मूल्यांचे मूल्यमापन

७ - विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता, ८ - विद्यार्थ्यांचा आर्थिक स्तर भिन्नता ही अध्यापकांनी मूल्य संख्या अधिक असल्याने मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणीमागील म्हणून नोंदवलेली कारणे मान्य करता येत नाहीत. कारण मूल्यसंख्या आणि अध्यापकांनी नोंदवलेली कारणे यांचा अर्थाअर्थी तसा काहीही संबंध दिसून येत नाही. सारणी क्र. ५.३२ मध्ये नोंद झालेली आठ कारणे ही मूल्यसंख्या अधिक असल्याने निर्माण होणाऱ्या अडचणीमागील कारणे नसून ती मूल्यसंक्रमणातील अडचणींचा निर्देश करतात.

म्हणून मूल्यसंख्या अधिक असल्याने मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणीमागील कारणे म्हणून सारणी क्र. ५.३२ मध्ये नोंद केलेली कारणे अध्यापकांनी अनुकूल प्रतिसाद दिला असला तरी मान्य करता येत नाहीत.

## ५.९ मूल्ये आणि त्यांचे मूल्यमापन :

पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित झाली आहेत की नाहीत याचे मूल्यमापन करावे काय ? मूल्यमापन करण्यापाठीमागील किंवा न करण्या पाठीमागील कारणे कोणती ? मूल्यसंक्रमणाचे प्रमाणाचे मूल्यमापन करता येईल का ? करता येत असल्यास कशाप्रकारे करता येईल ? करता येत नसल्यास का करता येणार नाही ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावली मध्ये प्रश्न क्र. १६, १६.अ, १६.ब, १७, १७.अ, १७.ब ची योजना केलेली होती. अध्यापकांकडून वरील प्रश्नांना मिळालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण आणि वर्गीकरण त्या त्या प्रश्नाला अनुसरून अनुक्रमे खाली केले आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १६ - मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाहीत याचे मूल्यमापन करावे काय ? हा प्रश्न होता. हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. याला दिलेल्या होय-नाही या पर्यायापैकी मान्य असणाऱ्या पर्याया-समोर बरोबर ( ✓ ) अशी खूण अध्यापकास करावयास सांगितली होती. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद खालील सारणीमध्ये नोंदवला आहे.

सारणी क्रमांक ५.३३

मूल्यकंक्रमणाचे मूल्यमापन करावे काय याबाबत अध्यापकांचे मत

| अनु. | होय-नाही | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ७४ | ७८ |
| २. | नाही | २१ | २२ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी क्र. ५.३३ वरून असे आढळून येते की, ९५ अध्यापकांपैकी ७४ अध्यापकांच्या (७८ टक्के) मते मूल्य संक्रमित झाली आहेत की नाहीत याचे मूल्यमापन केले पाहिजे आणि २१ अध्यापकांच्या (२२ टक्के) मते असे मूल्यमापन केले जाऊ नये असे वाटते. याचा अर्थ बहुसंख्य अध्यापकांच्या मते (७८ टक्के) मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन केले पाहिजे असे वाटते. त्यांचे हे मत मान्य होण्यास कोणतीही हरकत नसावी. मूल्यसंक्रमण ही अवघड भासणारी प्रक्रिया असली, तरी मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन झाल्याशिवाय आपण मूल्यसंक्रमणासाठी योजलेले मार्ग योग्य की अयोग्य, संक्रमण किमपत झाले आहे, काही समस्या असल्यास त्यातून मार्ग काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे याचा बोध घेण्यासाठी असे मूल्यमापन गरजेचे आहे. कोणत्याही गोष्टीबाबतीत असे मूल्यमापन आवश्यक आहे. मूल्यसंक्रमण हे त्याला अपवाद असू नये.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १६.ब - मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाहीत याचे मूल्यमापन करावे काय ? उत्तर होय असल्यास त्याची कारणे कोणती ? हा होता. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. ९५ अध्यापकांपैकी ७४ अध्यापकांनी (७८ टक्के) होकारात्मक प्रतिसाद नोंदवला आहे. या कारणांची नोंद सामर्थ्य तत्वाच्या आधारे क्रमाने आशयाचे प्रतिसाद एका विधानात

समाविष्ट करून अशा विधानांना मिळालेल्या अध्यापकांच्या प्रतिसादाच्या खालील सारणीमध्ये केलेली आहे.

सारणी क्र. ५.३४

मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन का करावे या संबंधातील कारणे
प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार

| अनु. | कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मूल्यसंक्रमण झाले की नाही हे पाहण्यासाठी. | ४३ | ४५ |
| २. | अध्यापनातील [illegible] सफलता व अध्यापनातील उणीवा समजावण्यासाठी. | १८ | १९ |
| ३. | मुलांमध्ये मूल्यांची जाणीव अधिक होण्यासाठी | ५ | ५ |
| ४. | मूल्यसंबंधात नवीन उपाययोजना निश्चित करण्यासाठी | २ | २ |
| ५. | विद्यार्थ्यांची बौद्धिक व मानसिक पातळी जाणून घेण्यासाठी | २ | २ |
| ६. | आत्मिक समाधानासाठी | १ | १ |
| ७. | पाठ्यपुस्तकाचा दर्जा समजावण्यासाठी | १ | १ |

वरील सारणी क्र. ५.३४ मध्ये मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन का करावे या संबंधात एकूण ७ कारणे नोंदविली आहेत. मूल्यसंक्रमण झाले की नाही हे पाहण्यासाठी मूल्यमापन आवश्यक आहे असे ४५ टक्के अध्यापकांना वाटते. सारणी क्र. ५.३३ संबंधी विवेचनामध्ये मूल्यमापन का आवश्यक याचे स्पष्टीकरण

आधीच आकाराचे ध्येय दिले नाही. अध्यापकांचे हे म्हणणे मान्य करावयास हरकत नसावी.

सारणी क्र. ५.१४ मधील अनुक्रमांक २ ते ६ या पाच कारणांना अध्यापकांनी अल्प प्रतिसाद (१९ टक्के ते १ टक्का) दिलेला असला तरी अनुक्रमांक ३ – मुलांमध्ये मूल्यांची जाणीव अधिक होण्यासाठी, ४ – मूल्यसंक्रमणात नवीन उपाययोजना निश्चित करण्यासाठी, ५ – विद्यार्थ्यांची बौद्धिक व मानसिक पातळी समजून घेण्यासाठी, ६ – आत्मिक समाधानासाठी, ७ – पाठ्यपुस्तकाचा दर्जा अजमावण्यासाठी मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन आवश्यक आहे हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते.

कारण आपल्या वर्तनाचे शिक्षक जाणीवपूर्वक मूल्यमापन करताहेत हे ज्यावेळी विद्यार्थ्यांना कळते त्यावेळी मूल्य रुजण्याची जाणीव त्यांच्या मनात अधिक तीव्र होते. या जाणीवेमुळे मूल्यसंक्रमण सुलभ होत असते.

मूल्य संक्रमणासंबंधात आपण जी पध्दती वापरतो, विद्यार्थ्यांना जे अध्ययन अनुभव देतो, त्यांमध्ये काही त्रुटी आहेत का ? वापरण्यात येणाऱ्या पध्दतीमध्ये काही दोष आहेत का हे जाणून घेण्यासाठीही मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे असे नमूद करावे वाटते.

मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन केल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाचा शोध आपल्याला घेता येतो. हा विकास अल्प प्रमाणात होत असल्यास त्यांच्या बौद्धिक आणि मानसिक अवस्थेतल्या काही त्रुटी असल्यास त्या आपल्याला समजून घेता येतात व त्यातून योग्य मार्ग काढता येतो.

जो अध्यापक शिक्षकीपेशा व्रत म्हणून स्विकारतो. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण करीत असताना जाणीवपूर्वक अष्टावधानी राहिलेला असतो. जे मूल्यसंक्रमणाचे कार्य करतो त्यामध्ये तो आत्मिक समाधान शोधत असतो.

स्वतःच्या कार्याचे यश हे त्याला आत्मिक समाधान देत असते. ते यश किती प्रमाणात, कोणत्या पध्दतीने मिळाले आहे हे पाहण्यासाठी आदर्श शिक्षक मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करत असतात. त्यामधे त्यांना मिळणारे आत्मिक समाधान हे केवळ यशाचे असते.

पाठ्यपुस्तकाचा दर्जा तपासण्यासाठीही मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन व्हावे पाहिजे असे एका अध्यापकाने आपले मत नोंदवले आहे. त्याचे हे म्हणणेही काही प्रमाणात मान्य करावे लागते. कारण ज्या पाठ्यपुस्तकातून मूल्ये रुजवित करायची आहेत त्या पुस्तकाचे बहिरंग आणि अंतरंगही विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभाव टाकत असते. स्वच्छता, टापटीप हे मूल्य रुजवायचे असल्यास पाठ्य-पुस्तकाची, बांधणी, कव्हर, टाईप या बाबी देखील देखण्या असणे आवश्यक ठरते. पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात मूल्यांना अनुसरुन असणारे पाठ योग्य प्रसंग निर्मिती करणारे, विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि भावनेला साद घालणारे असतील तरच विद्यार्थी संबंधित पाठाकडे आकृष्ट होतो. तो पाठ आणि ते पाठ्यपुस्तक त्याला आवडू लागते. म्हणून मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन केल्यास आपल्याला पाठ्यपुस्तकाचा दर्जाही तपासता येतो व योग्य पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीत मार्गदर्शनही करता येते.

प्रश्न क्र. १८.ब – ` मूल्य संक्रमण व्हावे आहे की नाही याचे मूल्यमापन करावे काय ? उत्तर नाही असेल तर त्याची कारणे कोणती ? ` हा मुक्त स्वरुपाचा प्रश्न होता.

९५ पैकी १४ अध्यापकांनी (१४ टक्के) या प्रश्नाला प्रतिसाद देऊन कारणांची नोंद केलेली आहे. साधर्म्य तत्वाचा आधार घेऊन समान आशय असणारी कारणे एका विधानामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. अशी विधाने खालील सारणी क. ५.३५ मध्ये अध्यापकांच्या प्रतिसादाच्या वारंवारितेसह नोंदवलेली आहेत.

## सारणी क्र. ५.३५

## मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन का करू नये याची कारणे

| अनु. | मूल्य संक्रमणाचे मूल्यमापन का करू नये कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मूल्यमापन ही तात्कालिक मोजपट्टी | ७ | ७ |
| २. | मूल्यसंक्रमण वर्षानुवर्षे चालणारी क्रिया | ३ | ३ |
| ३. | मूल्यमापन व्यक्तीसापेक्ष असण्याची शक्यता | १ | १ |

वरील सारणी क्र. ५.३५ मध्ये मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन का करू नये या संदर्भात तीन कारणांची नोंद झालेली असून तीन्ही कारणांना अत्यल्प प्रतिसाद मिळालेला आहे. (७ टक्के ते १ टक्का), तरीदेखील या तिन्ही कारणांचे अधिक स्पष्टीकरण होणे गरजेचे वाटते.

मूल्यमापन ही तात्कालिक मोजपट्टी आहे (अनुक्रमांक १) म्हणून मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने मूल्यमापन योग्य नव्हे असे ७ टक्के अध्यापकांना वाटते. त्यांच्या मते मूल्यसंक्रमण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थी तीन वर्षे असतो. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थी केवळ दोन वर्षे माध्यमिक शाळेत राहणार आहे. मूल्यसंक्रमण झाले किंवा नाही हे त्याच्या अनुभवा (मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात) शैक्षणिक वर्षात मूल्यमापन करून सांगणे अवघड आहे. रुजलेल्या मूल्यांचे प्रकटीकरण या शैक्षणिक वर्षात होईलच असे नाही. तसेच ती मूल्ये दोन वर्षात पूर्णांशाने मुरलेली असतीलच असे नाही. त्यामुळे मूल्यमापन ही तात्कालिक मोजपट्टी मूल्यसंक्रमणासाठी योग्य नाही.

अध्यापकांचे हे म्हणणे वरवरनी तरी पटत असले तरी ते मान्य होण्यासारखे नाही. मूल्यमापनासाठी आपण ज्या पध्दती वापरत आहोत त्यामुळे अध्यापकांना असे वाटणे स्वाभाविक आहे. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे मूल्यसंक्रमणा संबंधीत झालेले मूल्यमापन तेथेच राहते. माध्यमिक पातळीवरचे मूल्यमापनही माध्यमिक पातळीवर राहते. कारण शिक्षणाच्या निरनिराळ्या स्तरांमधील सहकार्य सामंजस्य असावे तितके असत नाही. त्यामुळे मूल्यसंक्रमणाच्या मूल्यमापनामध्ये खंड पडत जातो. नवीन शैक्षणिक स्तरावर नवीन सुरू केलेले मूल्यमापन अपुरे ठरण्याची शक्यता असते. मूल्यसंक्रमण ही अखंड चालणारी प्रक्रिया लक्षात घेऊन तिचे सातत्याने मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामध्ये शिक्षणाच्या सर्व स्तरांचा समन्वय व सामंजस्य आवश्यक आहेच व तसेच शाळा, पालक, शिक्षक यांचे अंतरसामंजस्यही गरजेचे आहे.

मूल्यसंक्रमण वर्तनातून व्यक्त होते म्हणून मूल्यमापनाची गरज नाही असे १ टक्के अध्यापकांनी मत नोंदवले आहे (अ.क्र.२) त्यांचे हे म्हणणे मान्य केले तरी तेथे वर्तनाचे सूक्ष्म निरीक्षण अभिप्रेत आहे. आणि `निरीक्षण` हे मूल्यमापनाचे एक साधन आहे हे नमूद करावे वाटते.

मूल्यमापन व्यक्तीसापेक्ष असण्याची शक्यता त्यामुळे मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करू नये (अ.क्र.३) असे एका अध्यापकाने मत नोंदवले आहे. त्यांचे हे म्हणणे मात्र अमान्य करावे लागते. कारण कोणत्याही मानवी जीवनाशी संबंधित असणाऱ्या गोष्टीचे मूल्यमापन एक व्यक्ती किंवा समूह करीत असतो. व्यक्तीसापेक्ष किंवा समूहसापेक्ष मूल्यमापन होण्याची शक्यता अध्यापकाने गृहीत धरलेली आहे. पण कोणतेही मूल्यमापन हे वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे असा अपेक्षित नियम घेऊनच मूल्यमापनाकडे आपण पहात असतो. म्हणून मूल्यमापन व्यक्तीसापेक्ष असण्याची शक्यता असल्यामुळे मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करू नये हे मत पटण्यासारखे नाही.

तसेच मूल्यसंकलन झाले आहे की नाही याचे मूल्यमापन करीत असताना ज्या विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन करायचे त्या विद्यार्थी अपेक्षा मूल्यमापन झाले तर त्यात चुकीचे काही वाटत नाही. कारण त्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करून आपल्याला मूल्यसंकलनाच्या संदर्भात अन्वयार्थ काढावयाचा असतो. मूल्यमापन करणाऱ्या व्यक्तीने वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवणे हे या ठिकाणी महत्त्वाचे आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १७ – मूल्यसंकलन किती प्रमाणात झाले याचे मूल्यमापन करता येईल का ? हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. प्रश्नाला दिलेल्या होय–नाही या पर्यायांपैकी अनुरूप असणाऱ्या पर्यायासमोर बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगितले होते. अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये नमूद केला आहे.

सारणी क्र. ५.२६

मूल्यसंकलनाचे प्रमाणबध्द मूल्यमापन करता येईल का या संदर्भात अध्यापकांचे मत

| अनु. | होय–नाही | अध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ७० | ७४ |
| २. | नाही | २५ | २६ |
| | एकूण : | ९५ | १०० |

वरील सारणी क्र. ५.२६ वरून असे दिसून येते की मूल्यसंकलनाचे प्रमाणबध्द मूल्यमापन करता येईल असे ९५ पैकी ७० अध्यापकांना (७४ टक्के) वाटते, तर २५ अध्यापकांना (२६ टक्के) असे मूल्यमापन करता येणार नाही

असे वाटते. याचाच अर्थ असा होतो की मूल्यशिक्षणाचे प्रमाणबध्द मूल्यमापन करता येईल असे बहुतेक अध्यापकांचे म्हणणे आहे. मूल्यशिक्षण ही व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची प्रक्रिया असल्याने तिचे ठरवलेल्या प्रमाणात मूल्यमापन करणे अशक्य असले तरी ' श्रेणी ' हे प्रमाण मानून मूल्यमापन आपणास शक्य आहे. म्हणून मूल्यशिक्षणाचे प्रमाणबध्द मूल्यमापन करता येईल हे ७४ टक्के अध्यापकांचे म्हणणे मान्य होण्यास हरकत नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १०.ब – मूल्यशिक्षण किती प्रमाणात झाले याचे मूल्यमापन करता येईल का ? उत्तर होय असल्यास कशा प्रकारे करता येईल ? हा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. अध्यापकांनी दिलेल्या उत्तरांचे साधर्म्य लक्षात घेऊन आशयाचे प्रतिपादन एका विधानात समाविष्ट केले आहेत. अशी विधाने अध्यापकांच्या प्रतिसादासह खालील सारणी क्रमांक ५.३७ मध्ये नोंदविलेली आहेत.

<u>सारणी क्र. ५.३७</u>

<u>मूल्यशिक्षणाचे प्रमाणबध्द मूल्यमापनाचे मार्ग</u>

(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अ.क्र. | मूल्यमापनाचे मार्ग | अध्यापकांचा प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांचे वर्तन निरीक्षण व वर्तन चिकित्सा (प्रसंग, विविध स्पर्धा, उपक्रमातील सहभाग, कृती निरीक्षणाद्वारे) | ४९ | ६६ |
| २. | विद्यार्थ्यांची चाचणी (लेखी-तोंडी) | १६ | २३ |
| ३. | मूल्यशोधक व मूल्यमापक पूरक प्रश्नावली | १५ | २१ |
| ४. | विद्यार्थ्यांचे मुलाखत | ३ | ४ |
| ५. | पालकांशी संपर्क | ३ | ४ |
| ६. | विद्यार्थ्यांशी चर्चा (सामुदायिक-व्यक्तिगत) | ३ | ४ |

प्रश्न क्र. ६७.ब ला ९५ अध्यापकांपैकी ७० अध्यापकांनी (७४ टक्के) होकारार्थी मत नोंदविले आहे. या ७० अध्यापकांनी सुचविलेले मूल्यमापनाचे मार्ग त्यांच्या प्रतिसादाच्या वारंवारितेसह सारणी क्र. ५.३७ मध्ये नोंदविले आहेत.

विद्यार्थ्यांचे वर्तन निरीक्षण व वर्तन चिकित्सा हा एक मूल्यसंक्रमणाच्या मूल्यमापनाचा मार्ग आहे. (सारणी क्र. ५.३७ अ.न. १) असे ६६ अध्यापकांचे (६६ टक्के) मत आहे. त्यांचे हे मत मान्य होण्यास कोणताच प्रत्यवाय नसावा. कारण मूल्यसंक्रमणाचे प्रत्यंतर हे व्यक्तीच्या वर्तनातून दिसते. या वर्तनाचे निरीक्षण, चिकित्सा करून मूल्यसंक्रमणासंबंधीत आपल्याला मूल्यमापन करता येणे शक्य आहे. यासाठी विविध प्रसंगातील त्यांची कृती, विविध स्पर्धांतून भाग घेत असताना त्यांचे झालेले वर्तन दर्शन, निरनिराळ्या उपक्रमातून सहभागी होत असतानाचे त्यांचे वर्तन यांचे निरीक्षण करावे लागेल व निष्कर्ष काढावे लागतील.

विद्यार्थ्यांची तोंडी व लेखी चाचणी घेणे (अ.नं.२) हा एक मूल्यसंक्रमणाच्या मूल्यमापनाचा मार्ग आहे असे २६ अध्यापकांनी (२७ टक्के) आपले मत नोंदविले आहे. विद्यार्थ्यांना अशी लेखी व तोंडी चाचणी देऊन त्यांचा ज्ञानाचा कल, वर्तनाचा कल अजमावता येतो. पण अशा चाचण्यांमधून मुले जरी उत्तरे देतीलच असे खात्रीलायकरीत्या सांगता येत नसल्याने हा मार्ग मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात मर्यादित स्वरूपात वापरला जावा असे सुचवावेसे वाटते.

सारणी क्र. ५.३७ मधील अनुक्रमांक ३ - मूल्यशोधक व मूल्यसंवर्धक प्रश्नावली विद्यार्थ्यांना देऊन मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करावे या २१ टक्के अध्यापकांच्या म्हणण्यासाठी अ.न. २ चे विवेचन पुरे आहे. म्हणून हाही मार्ग मर्यादित स्वरूपात वापरला जावा असे वाटते.

विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यामध्ये (अ.नं.४) विशिष्ट प्रश्न आणि त्यांची उत्तरे असा प्रकार नसल्याने विद्यार्थ्यांच्या अंतर्मनातील प्रतिक्रिया काही अंशी शोध मुलाखतीमुळे घेता येतो. व त्या अनुषंगाने त्यांच्यातील मूल्यसंक्रमण अजमावता येते. यासाठी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये मुलाखत घेतली गेली जाणे महत्त्वाचे असते. अन्यथा विद्यार्थी मुलाखतीमध्ये सुद्धा जाणूनबुजून चुकीची उत्तरे देण्याची शक्यता असते.

पालकांशी संपर्क साधून (अ.नं. ५) व विद्यार्थ्यांशी गटवार चर्चा किंवा व्यक्तिगत चर्चा करून (अ.नं. ६) मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करता येईल असे प्रत्येकी ४ टक्के अध्यापकांना वाटते. पालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या शाळेबाहेरील वर्तनाचा अंदाज बांधता येतो. घरातील विद्यार्थ्यांसमोर निर्माण झालेल्या समस्येस तो कसे तोंड देतो याबाबत शोध पालकांच्या संपर्काने घेता येतो. विद्यार्थ्यांशी गटवार किंवा व्यक्तिगत चर्चा केल्याने विद्यार्थ्यांची मनोभूमिका, वर्तन पृष्ठभूमी जाणण्यामध्ये सुलभता प्राप्त होते.

यावरून असे अनुमान काढता येते की, सारणी क्र. ५.३७ मध्ये नोंद झालेल्या मूल्यसंक्रमणाच्या मूल्यमापनाच्या मार्गांना कमी अधिक प्रतिसाद अध्यापकांकडून मिळाला असला, तरी सर्व हेच मार्ग या संदर्भात कमी अधिक महत्त्वाचे आहेत. म्हणून ते त्यांच्या योग्यतेनुसार त्या मार्गातील त्रुटी लक्षात घेऊन अंमलात आणून मूल्य संक्रमणाचे मूल्यमापन केले जावे असे सुचवता येते.

प्रश्न क्रमांक १७.ब – मूल्यसंक्रमण किती प्रमाणात झाले याचे मूल्यमापन करता येईल का ? उत्तर नाही असल्यास त्याची कारणे कोणती ? हा मुक्त स्वरूपाचा प्रश्न होता. अध्यापकांनी दिलेल्या कारणांचे साधर्म्य तत्त्वाच्या आधारे समान आशयाचे प्रतिसाद एका विधानामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत अशी विधाने अध्यापकांच्या प्रतिसादासह खालील सारणीमध्ये नोंदविलेली आहेत.

### सारणी क्र. ५.३८

**मूल्यसंक्रमणाचे प्रमाणबध्द मूल्यमापन का करू नये याची कारणे**

(प्रतिसादकांच्या उत्तरांच्या श्रेणीनुसार)

| अनु. | कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मूल्यसंक्रमण मानसिक प्रक्रिया | ६ | ६ |
| २. | मूल्यमापनासाठी वेळ अपूर्ण | ५ | ५ |
| ३. | विद्यार्थी संख्या अधिक | ३ | ३ |
| ४. | श्रेणीनुसार वर्तन बदलते | १ | १ |

मूल्यसंक्रमणाचे प्रमाणबध्द मूल्यमापन का करू नये या संदर्भात वरील सारणी क्र. ५.३८ मध्ये चार कारणांची नोंद केलेली आहे. एकूण ९५ अध्यापकांचा विचार करता चार कारणांना अध्यापकाकडून मिळालेला प्रतिसाद हा अत्यल्प आहे. (६ टक्के पासून १ टक्क्यांपर्यन्त) याचा अर्थ असा निघतो की अध्यापकांच्या खूप मोठ्या संख्येने सारणी क्र. ५.३८ मध्ये नोंद झालेली कारणे स्वीकारलेली नाहीत.

मानसशास्त्राचा झालेला विकास आणि मूल्यमापनाच्या अनेकविध उपलब्ध असणाऱ्या पध्दती (उदा. नोंदी, प्रात्यक्षिक परीक्षा, निरीक्षण, प्रश्नावली, प्रासंगिक नोंदी, पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, सामाजिक मूल्यांकन इ.) यांचा विचार करता मूल्यसंक्रमण ही मानसिक प्रक्रिया आहे म्हणून तिचे प्रमाणबध्द मूल्यमापन करू नये (सारणी क्र. ५.३८ अ.नं. १) हे अध्यापकांचे म्हणणे पटणारे नाही.

मूल्यमापनासाठी वेळ अपूर्ण (अ.नं.२) म्हणून मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करू नये असे ५ टक्के अध्यापकांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते एखाद्या गोष्टीला वेळ कमी आहे म्हणून ती करू नये असा त्याचा असल्याने ते मान्य होण्यासारखे नाही. दुसरे असे की, मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन हे ठरवून दिलेल्या वेळेत करणे अशक्य आहे. हे मूल्यमापन अखंड चालू राहिले पाहिजे. त्यामुळे वेळ अपूर्ण हे कारण संमत नाही.

विद्यार्थी संख्या अधिक असल्याने (अ.नं. ३) मूल्यसंक्रमणाचे प्रमाणबद्ध मूल्यमापन करता येत नाही. हे ३ टक्के अध्यापकांचे म्हणणे काही अंशी मान्य करावे लागते. या संदर्भातील अधिक स्पष्टीकरण सारणी क्र. ५.११ मधील अनुक्रमांक ३ च्या विवेचनात (पृष्ठ क्र. ११४ वर) केले आहे.

वेळेनुसार वर्तन बदलते म्हणून मूल्यसंक्रमणाचे प्रमाणबद्ध मूल्यमापन करू नये (अ.नं.४) असे एका अध्यापकाला वाटते. पण ज्याचे वर्तन वेळेनुसार बदलते त्याच्यामध्ये मूल्यसंक्रमण झाले असे म्हणता येत नाही म्हणून त्याचे हे म्हणणे मान्य करता येत नाही.

यावरून असा अभिप्राय काढता येतो की सारणी क्र. ५.२८ मधील अनुक्रमांक १,२,४ ही कारणे मान्य होण्यासारखी नाहीत. केवळ अनुक्रमांक ३ - विद्यार्थी संख्या अधिक " हे कारणच काही अंशी संयुक्तिक वाटते.

५.१० <u>प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त अन्य माहिती</u> :

प्रश्नावलीमध्ये विचारण्यात न आलेली परंतु प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी माहिती यावी या उद्देशाने प्रश्न क्र. १८ ची योजना केलेली होती. अध्यापकांनी दिलेल्या माहितीबरोबर सूचना खाली दिलेल्या आहेत.

१) मराठी अभ्यासक्रम निर्मिती मंडळावर मूल्यमापनाची जाण असणारा तज्ञ नेमावा.

२) मूल्यमापनास उपयुक्त ठरतील असे सरावपाठ तज्ञांच्या मार्गदर्शनासाठी घेण्यात यावेत.

३) मूल्यमापनासाठी आवश्यक असणाऱ्या अध्यापन पद्धतीबाबत संशोधन व्हावे.

४) प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षानुसार कार्यवाही व्हावी.

सूचना क्र. १ - मूल्यमापनाची जाण असणारा तज्ञ अभ्यासक्रम निर्मिती मंडळावर नेमावा ही सूचना अत्यंत महत्वाची आहे. कारण तज्ञांनी जाणिवपूर्वक तयार केलेला अभ्यासक्रम मूल्यमापनासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

सूचना क्र. २ - तज्ञांच्या मार्गदर्शनासाठी मूल्यमापनाचे सराव पाठ घेतले जावेत. ही सूचना संबंधित विषय अध्यापकांना मिळणाऱ्या मार्गदर्शनासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

सूचना क्र. ३ - मूल्यमापनाच्या दृष्टीने अध्यापन पद्धती संबंधीत संशोधन झाल्यास ते अध्यापक, विद्यार्थी यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे आहे.

सूचना क्र. ४ - प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षानुसार कार्यवाही व्हावी हे म्हणणेही मान्य करावे लागेल. कारण शिक्षणशास्त्रामध्ये अनेक बाबींवर संशोधन होऊनही त्या संशोधनातील निष्कर्षाची अंमलबजावणी होत नसल्याने संशोधकाने संशोधनासाठी घेतलेल्या कष्टाचे चीज होत नाही व काही महत्वपूर्ण निष्कर्ष तसेच ग्रंथालयाच्या कपाटात पडून राहतात.

## ५.११ समारोप :

या प्रकरणामध्ये, अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण व विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्यात आला आहे. हा अन्वयार्थ १) अध्यापकांची सर्वसाधारण माहिती, २) पाठ्यपुस्तकातून संक्रमित होणारी मूल्ये आणि त्यांचे संक्रमण, ३) मूल्यासंदर्भात अध्यापकांचे प्रशिक्षण, ४) मूल्य आणि अध्यापकांचे व्यक्तिमत्त्व यांचा संबंध, ५) मूल्य आणि सामाजिक वास्तव यांचा संबंध, ६) मूल्य आणि अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमाचे आयोजन, ७) पाठ्यपुस्तकातील मूल्यांचे संख्या प्रमाण व त्यामुळे संक्रमणात येणाऱ्या अडचणी, ८) मूल्ये आणि मूल्यमापन आणि ९) प्रस्तुत संशोधनास उपयुक्त असणारी अन्य माहिती या संदर्भात लावलेला आहे.

पुढील प्रकरण ६ मध्ये या प्रकरणामध्ये लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत आणि त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

## संदर्भ सूची

१) वैदांते प.मा., प्राण (काव्यसंग्रह), कोल्हापूर : अप्रकाशित.

२) वैदांते प.मा., प्राण (काव्यसंग्रह), कोल्हापूर : अप्रकाशित.

३) Kothari D.S. (Chairman), Report of the Education Commission (1964-66) - Education and National Development, Reprint Edition, Delhi : N.C.E.R.T., 1971.

४) विनोबा, गीता प्रवचने, अधिकरण १२, आवृत्ती १२ वी, पृ. ३७ वर्धा : पवनार, परंधाम प्रकाशन, १९७०.

५) संपादक, शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री, श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, क्रमांक ४३९६, मुंबई : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, पुनर्मुद्रण, १९७३.

६) कुंटे वा.ब. (संपादक), कबीराचे बीजक, वर्धा (पवनार) : परंधाम विद्यापीठ, १९६२.